follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २२५ ✲ सातारा ✲ मंगळवार, दि. २३ एप्रिल २०२४ ✲ पाने ६ (सुप्रभात) ✲ किंमत ५/- रूपये

# प. बंगालमध्ये शिक्षक भरती घोटाळा

## २४ हजार शिक्षकांच्या नियुक्त्या रद्द : उच्च न्यायालयाचा आदेश

- ८ वर्षांचे पगार परत करण्याची सूचना

**कोलकाता : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना कोलकाता हायकोर्टाकडून दणका बसला आहे. २०१६ मध्ये झालेली शिक्षक भरती हायकोर्टाने सोमवारी रद्द केली. याशिवाय बेकायदेशीर नियुक्तीवर काम करणाऱ्या शिक्षकांचे गेल्या ७-८ वर्षांत मिळालेले वेतन परत घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.**



कोलकाता हाय कोर्टाचे न्यायमूर्ती देवांशु बसाक आणि न्यायमूर्ती शब्बर रशिदी यांच्या खंडपीठाने पश्चिम बंगाल शाळा सेवा आयोगाला नवीन नियुक्ती प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्व बेकायदेशीर शिक्षकांवर १५ दिवसांत कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या प्रकरणातही अपवाद आहे. कर्करोगग्रस्त सोमा दास यांची नोकरी सुरक्षित राहील, असे न्यायालयाने म्हटले आहे.

पश्चिम बंगाल सरकारने राज्यस्तरीय परीक्षेद्वारे सरकारी आणि अनुदानित शाळांसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली होती. त्यानंतर २४,६४० रिक्त पदांसाठी २३ लाखांहून अधिक लोकांनी भरती परीक्षा दिली होती.

सीबीआयने राज्याचे माजी शिक्षण मंत्री पार्थ चॅटर्जी, त्यांची निकटवर्तीय महिला आणि काही अधिकाऱ्यांनाही भरती अनियमिततेच्या प्रकरणाची चौकशी करताना अटक केली होती. या भरतीत ५ ते १५ लाख रुपयांची लाच घेतल्याचा आरोप आहे.


ममता बॅनर्जी यांच्या सरकारने २०१४ मध्ये शिक्षकांची भरती केली होती. त्याची प्रक्रिया २०१६ मध्ये पूर्ण झाली. पार्थ चॅटर्जी तेव्हा राज्याचे शिक्षणमंत्री होते. ज्या उमेदवारांना कमी गुण मिळाले त्यांनाही गुणवत्ता यादीत उच्च स्थान देण्यात आल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे.

काही उमेदवारांची नावे गुणवत्ता यादीत नसतानाही त्यांना नोकरी देण्यात आली. टीईटी परीक्षाही उत्तीर्ण न झालेल्या काही उमेदवारांना नोकऱ्या देण्यात आल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. राज्यात शिक्षक भरतीसाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.

त्याचप्रमाणे २०१६ मध्ये राज्यात एसएससीद्वारे गट ड च्या १३ हजार भरतीबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या सर्व याचिकांवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने सीबीआय तपासाचे आदेश दिले होते. यानंतर ईडीने शिक्षक भरती आणि कर्मचारी भरतीप्रकरणी मनी ट्रेलची चौकशी सुरू केली. याप्रकरणी सीबीआयने १८ मे रोजी पार्थ चॅटर्जींचीही चौकशी केली होती.

# सातारा लोकसभेसाठी १६ उमेदवार रिंगणात

- अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट
- एकूण पाच जणांची माघार



**राजदंड / सातारा**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ अंतर्गत सातारा लोकसभा मतदारसंघात नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवसापर्यंत पाच उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे लोकसभा मतदारसंघाकरिता आता सोळा उमेदवारांमध्ये लढत होणार असल्याचं चित्र स्पष्ट झाले आहे.दरम्यान या निवडणूकीत थेट लढत महायुतीचे उमेदवार उदयनराजे भोसले विरूध्द महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यातच होणार आहे.

शनिवारी उमेदवारी अर्जांची छाननी प्रक्रिया पार पडली. यावेळी छाननीमध्ये तीन उमेदवारी अर्ज अवैध ठरले. त्यामुळे २१ उमेदवारांचे अर्ज निवडणुकीसाठी पात्र ठरले होते.यापैकी शनिवारी विठ्ठल सखाराम कदम(अपक्ष) यांनी अर्ज माघार घेतला होता.तर आज सोमवारी दादासाहेब वसंतराव ओव्हाळ (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)), दिलीप हरिभाऊ बर्गे (भारतीय जवान किसान पार्टी),सागर शरद भिसे (अपक्ष) आणि चंद्रकांत जानू कांबळे (अपक्ष) या चार जणांनी उमेदवारी अर्ज माघार घेतले. अशा एकुण पाच उमेदवारांनी आजच्या अंतिम दिवसाअखेर अर्ज माघारी घेतले आहेत.

दरम्यान, एका ईव्हीएम मशीनवर १५ उमेदवार व एक नोटा असे १६ नावांची मर्यादा असल्याने फक्त नोटा या पर्यायासाठी दुसरी ईव्हीएम मशीन मतदान केंद्रावर वाढली आहे. त्यामुळं प्रत्येक मतदान केंद्रावर दोन ईव्हीएम मशीन लागणार आहेत. ७ मे रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली.

### उमेदवार आणि चिन्ह खालीलप्रमाणे...

१) आनंद रमेश थोरवडे (बहुजन समाज पार्टी) चिन्ह – हत्ती
२) श्रीमंत छत्रपती उदयनराजे प्रतापसिंह महाराज भोसले (भारतीय जनता पार्टी) चिन्ह – कमळ
३) शशिकांत जयवंतराव शिंदे (नॅशनॅलिस्ट कॉंग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार) पक्ष चिन्ह – तुतारी वाजवणारा माणूस
४) प्रशांत रघुनाथ कदम (वंचित बहुजन आघाडी) चिन्ह – प्रेशर कुकर
५) तुषार विजय मोतलिंग (बहुजन मुक्ति पार्टी) चिन्ह – खाट
६) सयाजी गणपत वाघमारे (बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी) चिन्ह – शिट्टी
७) डॉ. अभिजीत वामनराव आवाडे-बिचुकले (अपक्ष) चिन्ह – कपाट
८) सुरेशराव दिनकर कोरडे (अपक्ष) चिन्ह – ऑटो रिक्षा
९) संजय कोंडीबा गाडे (अपक्ष) चिन्ह – तुतारी
१०) निवृत्ती केरु शिंदे (अपक्ष) चिन्ह – चालण्याची काठी
११) प्रतिभा शेलार (अपक्ष) चिन्ह – गॅस सिलेंडर
१२) सदाशिव साहेबराव बागल (अपक्ष) चिन्ह – दूरदर्शन
१३) मारुती धोंडीराम जानकर (अपक्ष) चिन्ह – हिरा
१४) विश्वजीत पाटील-उंडाळकर (अपक्ष) चिन्ह – बॅट
१५) सचिन सुभाष महाजन (अपक्ष) चिन्ह – फुगा
१६) सीमा सुनिल पोतदार (अपक्ष) चिन्ह – बॅटरी टॉर्च

## थोडक्यात

### व्यंकय्या नायडूंसह ३ जणांना पद्मविभूषण; मिथुन चक्रवर्ती, उषा उथुप यांना पद्मभूषण

**नवी दिल्ली :** सोमवारी संध्याकाळी राष्ट्रपती भवनात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. २५ जानेवारी रोजी हे सन्मान जाहीर करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी प्रथम माजी उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू, बिंदेश्वर पाठक (मरणोत्तर) आणि पद्मा सुब्रमण्यम यांना पद्मविभूषण देऊन सन्मानित केले. बिंदेश्वर पाठक यांच्या पत्नी अमोला पाठक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यानंतर अभिनेते मिथुन चक्रवर्ती, गायिका उषा उथुप आणि सीताराम जिंदाल यांच्यासह काही लोकांना पद्मभूषण पुरस्कार देण्यात आला. याशिवाय मनोहर कृष्ण डोळे आणि रामचेत चौधरी यांच्यासह काही सेलिब्रिटींना पद्मश्री देण्यात आली.

### राज ठाकरे यांना मोठा दिलासा

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना भडकाऊ भाषण प्रकरणी न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने कथित प्रक्षोभक भाषण आणि चिथावणी देण्याबाबत कोणतेही पुरावे नसल्याचे म्हटले आहे. तसेच न्यायालयाने राज ठाकरे यांच्यावरील खटला फेटाळून लावला आहे. १६ वर्षे जुन्या प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता करण्याची याचिका फेटाळली होती. या आदेशाला राज ठाकरे यांनी आव्हान दिले होते.

### तरुणीला २३ लाखांचा ऑनलाईन गंडा

**पुणे :** फेडेक्समधून आलेल्या पार्सलमध्ये अवैध पासपोर्ट, कपडे, ड्रग्ज सापडल्याची बतावणी करीत सायबर चोरट्यांनी तरूणीला जाळ्यात अडकविले. त्यानंतर चौकशीच्या बहाण्याने स्काईप आयडीवरून फोन करून २३ लाख रूपये ऑनलाईनरित्या ट्रान्सफर करण्यास भाग पाडून फसवणूकीची घटना घडली आहे. याप्रकरणी विरोनिका रोलडा (वय २९, रा. वडगाव शेरी) यांनी चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## शिरवळ येथे गावठी पिस्टल आणि जिवंत काडतूस जप्त




**राजदंड / शिरवळ**

शिरवळ पोलीस ठाण्याच्या पेट्रोलिंगदरम्यान पोलिसांनी दोन संशयित व्यक्तींकडून गावठी पिस्टल आणि जिवंत काडतूस जप्त केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,पेट्रोलिंगवर असलेल्या पोलीसांना विश्वसनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शिरवळ गायचे हददीतील पळशी रोडला दोन संशयित इसम धनलक्ष्मी रेसिडेंटच्या पार्कींग आवारात संशयीतरित्या फिरत आहेत.

पोलिसांनी त्वरित घटनास्थळी पोहोचून संशयितांना ताब्यात घेतले (पान ३ वर)

## हत्तीची विनापरवाना वाहतूक; शेडबाळच्या संस्थेवर गुन्हा

**राजदंड / सांगली**

नांद्रे (ता. मिरज) येथे धार्मिक कार्यक्रमासाठी विनापरवाना हत्तीची वाहतूक केल्याप्रकरणी शेडबाळ (ता. कागवाड, जि. बेळगाव) येथील संस्थेवर वन्यजीव संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा नोंद करण्यात आला. श्री शांतीसागर दिगंबर जैन क्षेत्राश्रम यांच्यावर गुन्हा नोंद झाल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आला.



वनविभागाकडून दिलेली माहिती अशी की, हत्ती हा शेड्युल एक मधील वन्यजीव आहे. परराज्य किंवा जिल्ह्यात अन्यत्र कोठेही हत्तीला नेण्यासाठी वाहतूक परवान्याची गरज असते. त्या परवानगीशिवाय नेणे कायद्याने गुन्हा आहे. शेडबाळ येथील क्षेत्राश्रमाचा हत्ती नांद्रे येथे काल धार्मिक कार्यक्रमासाठी नेण्यात आल्याची माहिती वनविभागाच्या फिरता पथकाला मिळाली. त्यानुसार उपवनसंरक्षक नीता कट्टे, सहायक वनसंरक्षक डॉ. अजित साजणे यांच्या नेतृत्वाखाली वनक्षेत्रपाल महांतेश बगले यांच्या पथकने माधवनगर जकातनाका येथे सापला रचला. त्यावेळी (पान ३ वर)

# अजित पवार सर्वात निर्लज्ज व्यक्ती

### छत्रपती संभाजीनगरमधून आदित्य ठाकरे यांची घणाघाती टीका

**छत्रपती संभाजीनगर :** ज्या व्यक्तीने तुम्हाला सर्व काही दिले, ज्यांनी तुम्हाला मंत्री पदे दिली, त्यांच्या कठीण काळात खंजीर खुपसून तुम्ही त्यांच्याविषयी अशी वक्तव्य करत आहेत, असे म्हणत उद्धव ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. त्यांच्यासारखा निर्लज्ज व्यक्ती मी पाहिला नाही, अशी टीका देखील आदित्य ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर केली आहे. ज्यांनी त्यांना घडवले त्यांच्या पाठीत खुपसून महाराष्ट्राशी धोका करून सगळे उद्योग गुजरातला पळवले असल्याचे आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातील महाआघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्या प्रचारासाठी आदित्य ठाकरे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या वेळी त्यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला.




आदित्य ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देखील प्रत्युत्तर दिले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मला तुरुंगात टाकण्याचा प्लॅन होता, असा गौप्यस्फोट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला होता. यावर आदित्य ठाकरे यांनी पलटवार केला आहे. जे तुरुंगाला घाबरून गुजरातला गेले, त्यांचे महाराष्ट्र अजिबात ऐकणार नाही, असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. देशातील जनता ही इंडिया आघाडी सोबत आहे. सर्वांना चार जून रोजी आमची शक्ती दिसेल. शिवसेना (पान ३ वर)

# ‘तू सर्वात चांगली सून आहेस..!’

### माजी खासदार नानासाहेब नवले यांनी केली सुनेत्रा पवार यांची प्रशंसा

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** बारामती लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार या रविवारी मुळशी तालुक्यातील प्रचार दौऱ्यात होत्या. या दौऱ्यात ताथवडे येथेही त्यांनी भेट दिली. सुनेत्रा पवार ताथवडे येथे येणार म्हणून माजी खासदार विदुरा तथा नानासाहेब नवले हेही त्यांच्या ताथवडेतील निवासस्थानी आले होते. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनी त्यांची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांनी घरात पाऊल टाकताच नानासाहेब नवले म्हणाले ‘‘यु आर वन ऑफ द बेस्ट डॉटर इन लॉ’’



माजी खासदार नानासाहेब नवले यांच्या या म्हणण्याला नेमकी पार्श्वभूमी कोणती? हे ओळखून उपस्थित सर्वांनीच आनंद व्यक्त केला. तर सुनेत्रा पवार यांनी मात्र नानासाहेब नवले यांना नमस्कार करून त्या कंप्लिमेंटचा विनम्रपणे, नि:शब्दपणे स्वीकार केला.

शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वी ‘‘बाहेरची’’ असे संबोधून सून सुनेत्रा पवार यांना परके ठरवले होते. त्यावरून मोठी खळबळ देखील उडाली होती. या वक्तव्यावर मोठी टीकाही झाल्याने पवार यांना कधी नव्हे तो खुलासा करून आपण तसे बोललो नाही, आपला उद्देश तसा नव्हता. आपल्या म्हणण्याचा गैर अर्थ काढला (पान ३ वर)

# इंडिया आघाडी सत्तेवर आल्यास निवडणूक रोख्यांचा तपास करू - पृथ्वीराज चव्हाण

- निवडणूक रोख्यातून जगातील सर्वात मोठा घोटाळा झाल्याचा आरोप

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** ईडी सीबीआयच्या धाडी टाकून मोदी सरकारने मोठ्या कंपन्या व व्यक्तींना भिती दाखवत निवडणुक रोख्याच्या नावाखाली पैसा गोळा केला. त्यांनी निवडणुक रोख्याच्या माध्यमातून जगातील सर्वात मोठा घोटाळा केल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे प्रदेश प्रचारप्रमुख पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. देशात इंडीया आघाडीचे सरकार आल्यावर आम्ही निवडणुक रोखे प्रकरणाचा तपास करू, असेही ते म्हणाले. पुणे लोकसभेचे महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे उमेदवार आ. रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ काँग्रेस भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत चव्हाण बोलत होते. यावेळी माजी महसुलमंत्री बाळासाहेब थोरात, काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष व लोकसभा निवडणूक प्रचारप्रमुख मोहन जोशी, माजी राज्यमंत्री रमेश बागवे, माजी आमदार दिप्ती चवधरी, ॲडअभय छाजेड, कमल व्यवहारे, संजय बालगुडे, वीरेंद्र किराड, गोपाल तिवारी इत्यादी उपस्थित होते.

चव्हाण म्हणाले, डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळातील विकास दर जेवढा होता, तेवढा विकास दर मोदींच्या काळात राहिला असता तर आपली अर्थव्यवस्था आज जगात तिसऱ्या नंबरवर गेली असती. मात्र, मोदींच्या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये अर्थव्यवस्थेचा दर खाली आला आहे. देशाची अर्थव्यवस्था ढासळली आहे. आज देशावर २०६ लाख कोटी कर्ज आहे. लोकांना चुकीची माहिती देवून भुरळ टाकण्याचे काम मोदी करत आहेत. मोदी सरकारने दहा वर्षात काय केलं याची श्वेत पत्रिका काढावी, म्हणजे २०१४ पूर्वी आणि नंतर काय झालं याची तुलना करता येईल. दरवर्षी २ कोटी लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. दहा वर्षात २० कोटि लोकांना रोजगार मिळायला हवा होता, मात्र काहीच झाले नाही, उलट देशात बेरोजगारी वाढली. डिझेल पेट्रोलचा भाव ३५ रुपये करण्याचे आश्वासन दिले होते, यांशिवाय शंभर शहरे स्मार्ट सिटी करण्याचे आश्वासन दिले, मात्र त्याचे काय झाले याचा अहवाल मोदींनी तयार करावा, असेही चव्हाण म्हणाले.

मोदी सरकार शेतकऱ्याच्या जीवनात वीष कालवत आहे. कोणालाही विश्वासात न घेता शेतीसंदर्भात तीन काळे कायदे केले. शेतकरी आंदोलनात सातशे पेक्षा जास्त शेतकऱ्यांचाजीव गेला. शेत मालास भाव नाही. कांदा, गहू, साखर, तांदुळ यांवर निर्यातबंदी घातल्यामुळे भाव पडले आहेत. त्यामुळेया निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांचे मतदान महत्वाचे आहे.

२०१९ मध्ये सत्तर टक्के लोकांनी मोदी विरोधी मते दिली. मात्र मत विभाजनामुळे मोदी सत्तेवर आले. त्यामुळे आम्ही इंडिया आघाडी

### बागुल यांची नाराजी दूर होईल : थोरात

**पुणे लोकसभेची उमेदवारी न मिळाल्याने महापालिकेतील माजी गटनेते आबा बागुल नाराज आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी बाळासाहेब थोरात यांनी बागुल यांची भेट घेतली होती. या संदर्भातील प्रश्नावर थोरात म्हणाले, नाराज्यांकडे जाणे बोलणे, आमचे काम आहे, बागुल यांची नाराजी दूर होईल अशी अपेक्षा आहे.**




### काळ्या पैशामध्ये मोदींचे तोडपाणी

**परदेशी बँकांमधील काळा पैसा भारतात आणून प्रत्येकाच्या बँक खात्यामध्ये १५ लाख रुपयेजमा करण्याचे आश्वासन देवून नरेंद्र मोदी २०१४ मध्ये सत्तेवर आले. त्यानंतर भारत सरकारकडे विविध संस्थांच्या माध्यमातून स्विस बँक आणि परदेशात गुंतवलेल्या काळ्या पैशाची सर्व माहिती आली. आजही भारत सरकारकडे यांची माहिती आहे. तरीही मोदी सरकारने आजवर संबंधीतांवर कारवाई केला नाही. याचा अर्थ यामध्ये कुठेतरी तोडपाणी झाले आहे. इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर आम्ही याबाबत माहिती उघड करू, असेही चव्हाण म्हणाले.**

# हल्ल्याचा धक्का

पहिला मुद्दा हल्ल्याच्या धक्क्याचा. तो या वेळी अजिबात नव्हता. कारण आपण इस्रायलवर हल्ले करू असा पुरेसा इशारा इराणने दिलेला होता आणि हे हल्ले कधी होतील याची पूर्व आणि पूर्ण कल्पना संबंधितांना होती. म्हणजे यातील पहिला आश्चर्य वा धक्क्याचा मुद्दा निकालात निघाला. दुसरा मुद्दा इराणने केलेली बॉम्बफेक रोखण्यात इस्रायलला आलेल्या 'यशाचा'. इराणची ही बॉम्बफेक रोखणे एकटया इस्रायली संरक्षण दलास जमलेले नाही. प्रत्यक्षात तीन अन्य देशांनी हे बॉम्बहल्ले रोखण्यात प्रत्यक्ष मदत केली. हे देश म्हणजे इस्रायलचा तारणहार अमेरिका, ग्रेट ब्रिटन आणि तिसरा देश म्हणजे जॉर्डन. या तीनही देशांचे विमानदळ या पूर्वसूचित हल्ल्यांचा प्रतिबंध करण्यात पूर्ण सज्ज होते. यातही जॉर्डनची विमाने तर उड्डाणसज्ज होती आणि त्यांनी अमेरिकी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अनेक इराणी बॉम्ब वरच्या वर निकामी केले. इस्रायल या देशास इराणचा हल्ला रोखण्यासाठी जॉर्डनचे लष्करी साहाय्य घ्यावे लागले, ही बाब पश्चिम आशियातील राजकारणाकडे सजगपणे पाहात असलेल्यांच्या भुवया उंचावणारीच.

कारण या सौदी, जॉर्डन आदी देशांच्या द्वेषावर इस्रायलच्या अस्तित्वाचा पाया उभा राहिलेला आहे. एक तर हे देश इस्लामी. त्यात अरब. आणि एके काळी इस्रायलविरोधात अरबी एकजूट करण्यात दोघांचाही लक्षणीय वाटा होता. जॉर्डन तर इस्रायल जन्मास आल्यापासून सीमावादाचा संघर्ष अनुभवत आहे. हा संघर्ष इतका तीव्र होता की एके काळी जॉर्डनच्या आकाशातून मार्गक्रमण करण्यास इस्रायली विमानांस मज्जाव होता. या दोन देशांतील संबंध अलीकडे गेल्या दशकभरात कामचलाऊ पातळीवर आले. या तुलनेत जॉर्डनप्रमाणे सौदी अरेबियाशी इस्रायलचा थेट संघर्ष कधी झाला नाही. पण १९७४ साली इस्रायल हे सौदी अरेबियाने अमेरिकेवर घातलेल्या तेलबंदीमागील कारण होते आणि अमेरिकेच्या 'अरबांकडून घ्यायचे आणि इस्रायलला द्यायचे' या धोरणास सौदी अरेबियाचा कायमच सक्रिय विरोध राहिलेला आहे. तथापि सौदी अरेबियाच्या सत्तास्थानी महंमद बिन सलमान अल सौद (एमबीएस) याचा उदय झाल्यापासून व्यापारी उद्दिष्टांच्या मिषाने या देशाचे इस्रायलसंबंध काही प्रमाणात सुधारले. मात्र अलीकडे गाझा युद्धामुळे हे संबंध ताणले गेलेले आहेत. पण तरीही जॉर्डनने या इराणी हल्ल्याच्या मुद्द्यावर इस्रायलला साथ दिली.

त्यामागील कारण धर्म. पश्चिम आशियाच्या वाळवंटात इस्रायलविषयी कोणत्याही देशास ममत्व नाही. यास उभय बाजू जबाबदार. पण हे मतभेद, वैरत्व विसरून हे दोन देश इस्रायलच्या मदतीस धावले कारण या दोन देशांची त्यातल्या त्यात 'कमी वाईट' निवडण्याची अपरिहार्यता. इस्रायल नकोच, पण सध्याच्या नेतृत्वाखालील इराण तर त्याहूनही नको, हे यामागील कारण. इराण हा या परिसरातील एकमेव शियाबहुल देश आणि समस्त अरब जगत हे सुन्नीप्रधान. त्यामुळे या एका मुद्द्यावर उभय गटांत तर मतभेद आहेतच. पण इराणचे महत्त्व वाढणे हे जॉर्डन, सौदी अरेबियास परवडणारे नाही. इराण, इजिप्त आणि सौदी अरेबिया हे तीनही देश स्वत:स या प्रांताचे मुखत्यार मानतात. हे तीनही देश आकाराने, लष्कराने मोठे आणि यातील सौदी आणि इराण हे तर तेलसंपन्न. त्यामुळे या प्रांताचे नेतृत्व आपल्याकडे यावे अशी मनीषा हे तिघेही बाळगून आहेत. यातील इजिप्त सद्य:स्थितीत मागे पडले आहे. इस्रायलवरील इराणी हल्ले यशस्वी ठरले असते तर इराणचे या परिसरातील प्राबल्य वाढले असते. ते जॉर्डनला नको आहे. तेव्हा इस्रायल आणि इराण यांतील कमी वाईट पर्याय म्हणून तो अमेरिकेसह इस्रायलच्या मदतीस धावला.

म्हणजे इस्रायल या देशांचा पाठिंबा गृहीत धरू शकत नाही. त्यात पुन्हा अमेरिकाही इस्रायलला बजावते. इराणवर प्रतिहल्ला चढवल्यास अमेरिका साथ देणार नाही, असा स्पष्ट इशारा अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी दिला. मुळात इराणने इस्रायलवर केलेला हल्ला हा इस्रायली फौजांनी सीरियातून इराणी दूतावासावर अकारण केलेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरार्थ आहे. त्यासाठी इस्रायलने माफीही मागितली. तरीही इराणने हल्ल्यास तयार राहा असा इशारा इस्रायलला दिला आणि त्याप्रमाणे कृती केली. म्हणजे इस्रायलच्या चुकीचे प्रत्युत्तर इराणने दिले. तेव्हा आता या प्रत्युत्तरास परत इस्रायलने प्रत्युत्तर देणे आगलावेपणाचे ठरेल. इस्रायलचे मित्रदेशही असेच मत व्यक्त करतात. त्यामुळे इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांची अधिकच चिडचिड होत असणार. एक तर इराणने अत्यंत शिस्तबद्धपणे इस्रायलवर हल्ला केला. इराणने थेट असे काही इस्रायलविरोधात करण्याची ही पहिलीच खेप. त्यातही पहिल्यांदा लहान ड्रोन, मग बॉम्ब, क्षेपणास्त्रे आणि अंतिमत: अधिक ताकदीची क्षेपणास्त्रे असा हा क्रम होता. इस्रायल ही क्षेपणास्त्रे वरच्या वर रोखू शकतो याची कल्पना अर्थातच इराणला होती. तरीही असे हल्ले केले गेले.

कारण त्यातून इस्रायलच्या या हल्ले रोखण्याच्या यंत्रणांचा पूर्ण आराखडा इराणी हवाईदलास ठाऊक झाला. कशा पद्धतीने हल्ला केल्यास इस्रायल कसा प्रतिसाद देते याचा अंदाज इराणला यातून मिळाला. काही जागतिक संरक्षण विश्लेषकांनी यावर भाष्य केले असून इराणच्या कृतीमुळे इस्रायलसाठी 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी स्थिती झाल्याचे म्हटले आहे. यास त्वेषाने उत्तर द्यावे तर अमेरिकेचा मोडता आणि न द्यावे तर इराणी युद्धास प्रत्युत्तर देता न येण्याचा अपमान अशा कात्रीत पंतप्रधान नेतान्याहू सापडलेले दिसतात. इराणकडे परत याखेरीज हेझबोल्लासारखे दहशतवादी संघटनांचे पर्याय असून इस्रायलवरील बॉम्बफेकीतून मिळालेली माहिती हेझबोल्लास पुरवली जाईल, अशी चिंता इस्रायलला आहे. या सर्वांचे मूळ आहे पंतप्रधान नेतान्याहू यांची युद्धाची खुमखुमी. ती कमी होताना दिसत नाही. त्यामुळे खुद्द त्यांच्या मायदेशात नेतान्याहूविरोधी वातावरण चांगलेच तापू लागले असून इराणच्या हल्ल्यामुळे सरकारविरोधातील नाराजी अधिकच वाढणे साहजिक. इस्रायल आणि नेतान्याहू हे इराणी हल्ले रोखण्यातील यश भले मिरवत असतील. पण या मिरवण्याच्या मर्यादाही लपून राहत नाहीत.

# २५ दिवसानंतर नाशिक जिल्ह्यात कांदा लिलाव सुरू

## ५५० कोटींचे नुकसान; इतर मालाचीही आवक सुरू



**नाशिक :** २५ दिवसांपासून व्यापाऱ्यांनी बहिष्कार टाकल्यामुळेनाशिकजिल्ह्यातील बाजार समित्यांचे कामकाज ठप्प होते. सहकार विभागाने दिलेला कारवाईचा इशारा, व्यापारी, बाजार समित्या व काही हमाल मापारींनी घेतलेली सकारात्मक भूमिका यामुळे सोमवारपासून (दि.२२) मनमाड व नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समिती वगळता जिल्ह्यातील इतर सर्व १३ बाजार समित्या व उप बाजार समित्यांमध्ये लिलाव सुरू झाले. त्यामुळेकांदाउत्पादकांनी समाधान व्यक्त केले. सकाळपासून बाजार समित्यांमध्येकांदाघेऊन आलेले ट्रॅक्टर लिलावासाठी रांगेत उभे होते. पहिल्या दिवशी कांद्याला कमीतकमी ११०१ ते सरासरी १३६० चा भाव मिळाला.-

ढनाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीत मात्र कांदा व इतर मालाची लिलाव प्रक्रिया सुरूच होती. त्यामुळे या बाजार समितीत नुकसान झाले नसले तरी इतर १४ बाजार समित्यांत मात्र कोट्यवधीचे नुकसान झाले. त्यामुळे शेतकरी संतप्त झाले होते. पहिल्या १५ दिवसांत ५०० कोटींचे नुकसान झाले होते. नंतर हा आकडा ५० ते ६० कोटींनी अजून वाढला. लेव्हीच्या वसुलीचा प्रश्न उभा राहिल्याने बाजार समित्या बंद होत्या. शेतकऱ्यांच्या पावतीमधून कपात केलेले माथाडी कामगारांचे १३६ कोटी रुपये लेव्ही २००८ पासून व्यापाऱ्यांकडे थकले आहेत. ही रक्कम जमा करण्यास व्यापारी टाळाटाळ करीत असल्याचा आरोप करून हमाल मापारी करीत आहेत. याच प्रश्नावरून व्यापाऱ्यांनी २५ दिवसांपासून लिलाव बंद ठेवले होते. कांदा काढणीचे काम वेगात सुरू असताना कांद्याचे लिलाव ठप्प झाले होते.हमाली, तोलाई कपात न करताच लिलावहमाल, मापाऱ्यांनी विरोध करूनही व्यापाऱ्यांनी मात्र हमाली, तोलाई कपात न करताच लिलाव सुरू केले. त्यामुळे कामगार व हमाल संतप्त झाले. परिणामी ४० टक्के कामगार, हमाल कामावर हजर झालेच नाही. परंतू आहे त्या हमालाच्या भरवशावर लिलाव सुरू झाले. फक्त लासलगाव येथेच प्रचलित (जुन्या) पद्धतीने लिलाव सुरू झाल्याची माहिती सहकार विभागाकडून देण्यात आली.

# हत्तीची विनापरवाना वाहतूक

## शेडबाळच्या संस्थेवर गुन्हा



**सांगली :** नांद्रे (ता. मिरज) येथे धार्मिक कार्यक्रमासाठी विनापरवाना हत्तीची वाहतूक केल्याप्रकरणी शेडबाळ (ता. कागवाड, जि. बेळगाव) येथील संस्थेवर वन्यजीव संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा नोंद करण्यात आला. श्री शांतीसागर दिगंबर जैन क्षेत्राश्रम यांच्यावर गुन्हा नोंद झाल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आला.

वनविभागाकडून दिलेली माहिती अशी की, हत्ती हा शेड्युल एक मधील वन्यजीव आहे. परराज्य किंवा जिल्ह्यात अन्यत्र कोठेही हत्तीला नेण्यासाठी वाहतूक परवान्याची गरज असते. त्या परवानगीशिवाय नेणे कायद्याने गुन्हा आहे. शेडबाळ येथील क्षेत्राश्रमाचा हत्ती नांद्रे येथे काल धार्मिक कार्यक्रमासाठी नेण्यात आल्याची माहिती वनविभागाच्या फिरता पथकाला मिळाली. त्यानुसार उपवनसंरक्षक नीता कट्टे, सहायक वनसंरक्षक डॉ. अजित साजणे यांच्या नेतृत्वाखाली वनक्षेत्रपाल महांतेश बगले यांच्या पथकने माधवनगर जकातनाका येथे सापला रचला. त्यावेळी ट्रकमधून हत्तीची वाहतूक होताना दिसून आली. याबाबत वाहतूकीची कोणतीही परवानगी नसल्याचे दिसून आले. त्यानुसार हत्तीला काल सायंकाळी सातच्या सुमारास वनविभागाने ताब्यात घेतले. आज संबंधितांवर गुन्हा नोंद करण्यात आला. वन्यजीव संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा नोद करण्यात आला.

# धाराशिवमध्ये अपक्षा हाती तुतारी

## संभ्रम दूर करण्याचे महाविकास आघाडीसमोर आव्हान

**धाराशिव :** उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी या दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये प्रमुख लढत आहे. महायुतीच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ चिन्हावर अर्चना पाटील रिंगणात उतरल्या आहेत. तर महाविकास आघाडीचे उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर मशाल चिन्ह घेवून निवडणूक लढवत आहेत. आखाड्यात उतरलेल्या एकूण ३१ उमेदवारांपैकी एका अपक्ष उमेदवाराला तुतारी चिन्ह मिळाले आहे. मतदान यंत्रावरील तुतारी चिन्हामुळे निर्माण होणारा संभ्रम दूर करण्याचे मोठे आव्हान महाविकास आघाडीला पेलावे लागणार आहे.

सोमवारी उमेदवारी मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातून चार उमेदवारांनी माघार घेतली आहे. निवडणुकीच्या आखाड्यात एकूण ३१ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. आजवर झालेल्या १७ लोकसभा निवडणुकांपैकी उमेदवारांचीही संख्या सर्वाधिक आहे.

महायुतीच्या उमेदवार अर्चना राणाजगजितसिंह पाटील आणि महाविकास आघाडीचे ओमप्रकाश राजेनिंबाळकर या दोघांमध्ये प्रमुख लढत असली तरी बहुजन समाज पार्टीचे संजयकुमार वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे भाऊसाहेब आंधळकर यांच्यासह उर्वरित २९ उमेदवारांमध्ये होणारी मतविभागणी कोणाच्या पथ्यावर पडणार, यावर निवडणुकीचा निकाल ठरणार आहे. निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेल्या ३१ उमेदवारांपैकी अपक्ष असलेले योगीराज अनंता तांबे यांना तुतारी हे चिन्ह मिळाले आहे.

परंडा तालुक्यातील जेकटेवाडी या गावचे योगीराज तांबे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. त्यांना तुतारी हे निवडणूक चिन्ह मिळाल्यामुळे निवडणुकीत आणखी रंगत येणार आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चिन्ह तुतारी असल्याचा प्रचार सर्वदूर झाला आहे. अपक्ष उमेदवार तांबे यांना तुतारी चिन्ह मिळाल्यामुळे निर्माण झालेला हा संभ्रम दूर करण्याचे मोठे आव्हान महाविकास आघाडीला पेलावे लागणार आहे. तुतारीसह अंगठी, कुकर, वाळूचे घड्याळ, भेंडी, चिमणी, फुलकोबी, पतंग, मोत्याचा हार, हिरा, शिट्टी, अशा अनेक रंजक चिन्हांचाही यावेळी मतदारांना सामना करावा लागणार आहे

# राज्यातील २१२ गृहप्रकल्पांबाबत महारेरा साशंक

**मुंबई :** महारेराकडे जानेवारी ते एप्रिल २०२३ दरम्यान नोंदणी झालेल्या २१२ प्रकल्पांबाबत महारेराच साशंक आहे. हे प्रकल्प सुरु झाले आहेत का? या प्रकल्पांची सद्यस्थिती काय याबाबतची कोणतीही माहिती या प्रकल्पांतील विकासकांनी महारेराकडे सादर केलेली नाही. प्रकल्प महारेराकडे नोंदविल्यानंतर दर तीन महिन्याला महारेराकडे त्रैमासिक प्रगती अहवाल विहित प्रपत्रात सादर करून तो संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. असे असताना विकासकांनी माहितीच दिली नसल्याचे उघड झाले आहे.

जानेवारी ते एप्रिल २०२३ दरम्यान महारेराकडे नोंदविलेल्या २३६९ प्रकल्पांपैकी ८८६ प्रकल्पांनी त्रैमासिक प्रगती अहवाल सादर केले नव्हते. त्यामुळे हे प्रकल्प स्थगित करून त्याचे बँक खाते गोठवणारी, प्रकल्पाच्या सर्व व्यवहारांवर बंदी आणण्यासाठीची कलम ७ अंतर्गत ३० दिवसांची नोटीस दिली होती. शिवाय वेळोवेळी दूरध्वनीवरून आवाहनही केले होते. त्यानंतर यापैकी ६७२ प्रकल्पांनी दंडाची रक्कम भरली. त्यातील २४४ प्रकल्पांनी रक्कम भरूनही त्रैमासिक प्रगती अहवालाची पूर्तता केलेली नाही. त्यांच्याकडून हे अहवाल अद्ययावत करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यापैकी जानेवारीतील ६०, फेब्रुवारीतील ५८, मार्चमधील ४० आणि एप्रिलमधील ५६ अशा एकूण २१२ प्रकल्पांनी कुठलाही प्रतिसाद दिलेला नाही. हे प्रकल्प सुरू झाले आहेत की नाही, त्यांची सद्यस्थिती काय याचीही माहिती नाही. त्यामुळे अशा प्रकल्पांची यादी महारेराने प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे घर खरेदी करताना ही यादी तपासावी असे आवाहन महारेराने केले आहे.

# दख्खनचा राजा श्री जोतिबाची चैत्र यात्रा

## पुर्वसंध्येला भाविकांची अलोट गर्दी; पहाटेपासून धार्मिक विधी



**कोल्हापूर :** महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रमधील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान, वाडी रत्नागिरी (ता. पन्हाळा) येथील दख्खनचा राजा श्री जोतिबा देवाची वर्षातील सर्वात मोठी चैत्र यात्रा आज मंगळवारी होत आहे. यानिमित्ताने पहाटेपासून धार्मिक विधी होणार असून यात्रेच्या पूर्वसंध्येला डोंगरावर लाखो भाविक सासनकाठ्यांसह दाखल झाले आहेत, डोंगर गुलालात न्हाऊन निघाले आहे. जिल्हा प्रशासन व पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीकडून यात्रेची तयारी पूर्ण झाली आहे.मंदिरात आज पहाटे तीन पासून धार्मिक विधी सुरू होतील. पाच वाजता शासकीय महाभिषेक, महापूजा, सकाळी १० वाजता धुपारती सोहळा होईल. दरवर्षी पालकमंत्र्यांच्या हस्ते सासनकाठ्यांच्या पूजनाने मिरवणूक सुरू होते.

यंदा लोकसभा आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते दुपारी बारा वाजता सासनकाठ्यांचे पूजन होईल. म्हालदार चोपदार यांच्या तोफेच्या सलामीने मिरवणुकीला प्रारंभ होईल. पहिला मान इनाम पाडळी (जि. सातारा) येथील सासनकाठीचा आहे. सायंकाळी साडेपाच वाजता तोफेच्या सलामीने जोतिबा मंदिरातून यमाई मंदिराकडे पालखी मार्गस्थ होईल .

सायंकाळी साडेसहा वाजता यमाई मंदिरात यमाईदेवी व जमदग्नी यांच्या विवाह सोहळा होईल. त्यानंतर पालखी श्री जोतिबा मंदिरात परत येईल. रात्री दहा वाजता पालखी सोहळ्याची सांगता होईल.यात्रेनिमित्त गेल्या चार दिवसांपासूनच मानाच्या सासनकाठया जोतिबा डोंगरावर दाखल झाल्या आहेत. चांगभलंच्या गजराने डोंगर दुमदुमून गेला आहे .डोंगर वाटा भाविकांच्या गर्दीने फुलून गेल्या आहेत. भाविक बैलगाडी, खाजगी वाहनातून, तसेच पायीदेखील जोतिबा डोंगरावर आले आहेत. यंदाच्या यात्रेला ज्यादा भाविक येतील असा अंदाज आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची तयारी पूर्ण झाली आहे.यात्रेवर सीसीटिव्हीचा वॉच असणार आहे.

दोन ठिकाणी आपत्कालीन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. डोंगराच्या पायथ्याशी पार्किंगची व्यवस्था आहे. भाविकांच्या सोयीसाठी स्वयंसेवी संस्थांकडून अन्नछत्र, आरोग्य उपचार केंद्राची करण्यात आली आहे. कोठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# वाळवा फलाटांवर गर्दी करण्याची गरज नाही; प्रवाशांना बसल्याजागीच मिळणार थंडगार पाणी

नागपूर: उन्हाळ्यात रेल्वे प्रवाशांचे पाण्यामुळे हाल होऊ नये म्हणून त्यांना थेट डब्याच्या खिडकीजवळ जाऊन पिण्याचेपाणीदेण्याची व्यवस्था रेल्वे प्रशासनाने केली आहे. त्यासाठी ठिकठिकाणच्या स्वयं सहायता बचत गटाची अन् सेवाभावी संस्थांची मदत घेण्यात आली आहे.

उन्हाळ्यात सर्वच रेल्वेगाड्याच्या जनरल डब्यात प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. रेल्वे स्थानक येताच ही मंडळी पिण्याचेपाणीघेण्यासाठी फलाटाच्या नळांवर गर्दी करतात. अशात काही नळांना पाणी नसने, धार बारिक असणे, असे प्रकार घडतात. तर, काही नळांना भरपूर पाणी असूनही एकाच वेळी प्रवाशांची पिण्याचे पाणी घेण्यासाठी झुंबड झाल्यामुळे आणि गाडीची वेळ



झाल्यामुळे अनेकांना पाणी मिळत नाही. गाडी निघाल्याने हातात पाण्याची बाटली धरून ओल्या हाताने काही जण धावत्या गाडीच्या दाराचा दंडा पकडण्याचा प्रयत्न करतात. यात काही वेळा हात घसरतो आणि धोका होण्याची भीती असते.

हे होऊ नये म्हणून मध्य रेल्वेच्यानागपूरविभागीय वरिष्ठांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. सर्व प्रथम फलाटावरील सर्वच्या सर्व नळांतून चांगले पाणी येईल, याची व्यवस्था करण्याचे आदेश सर्व रेल्वे स्थानक व्यवस्थापकांना देण्यात आले आहेत. त्यासाठी नळाची दुरूस्ती करून घेणे, तोट्या बदलविणे, नळातून पाण्याचा प्रवाह चांगला राहिल, याची व्यवस्था करण्याचेही सांगण्यात आले आहे. या शिवाय प्रवाशांना थंड आणि शुद्ध पाणी मिळावे म्हणून ठिकठिकाणच्या स्थानकांवर वॉटर कुलर उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रवाशांनी फलाटावर उतरून नळासमोर गर्दी करण्याऐवजी त्यांना डब्याजवळच थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचीही व्यवस्था केली आहे. त्यासाठी ठिकठिकाणच्या स्वयं सहायता गटासोबत, सेवाभावी संस्थांची मदत घेण्यात आली आहे.

रेल्वे डब्याच्या खिडकीजवळ जाऊन प्रवाशांना पिण्याचे थंड पाणी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था नागपूरसह मध्य रेल्वेच्या सात स्थानकांवर करण्यात आली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# पुण्यात महत्त्वाचे विकास प्रकल्प भाजपमुळे रखडले

## आ. धंगेकर यांचा आरोप



राजदंड न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील विकास कामांबाबत दूरदृष्टी आणि काम पूर्ण करून घेण्याची धमक नसल्यामुळेच गेली १० वर्षे केंद्रात, राज्यात व पुण्यात सत्तेवर असणाऱ्या भारतीय जनता पक्षामुळे पुण्यातील अनेक मोठे प्रकल्प रखडले. मुठा नदी सुधारणा ( जायका ) प्रकल्प, स्मार्ट सिटी, पुण्याची मेट्रो, पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार, पुण्याहून अनेक शहरांकडे जाणाऱ्या नव्या रेल्वे गाड्या असे कोणतेच प्रकल्प भाजप करू शकले नाही. मेट्रो तर गेल्या १० वर्षात पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे पुणेकरांचे मोठे नुकसान झालेले असून या परिस्थितीत परिवर्तन करीत महाविकास आघाडी व इंडिया आघाडीच्या काँग्रेसला मतदान यंत्रावरील पंजाच्या चित्रापूढील बटन दाबून विजयी करा, असे आवाहन पुणे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी केले.

कोथरूड मधील प्रभाग क्र. ११रामबाग कॉलनी – शिवतीर्थनगर येथे रविवारी सायंकाळी निघालेल्या विराट पदयात्रेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते.

कोथरूड विधानसभा मतदार संघातील प्रभाग क्र. ११ मधील ही पदयात्रा ना भूतो ना भविष्यती अशी झाली सुमारे ४००० हून अधिक कार्यकर्ते व नागरिक या पदयात्रेत सहभागी झाले होते.

पदयात्रेत महिलांचा सहभाग मोठा होता तसेच अनेक ठिकाणी महिला गटागटाने उभ्या राहून रवींद्र धंगेकर यांना ओवाळत होत्या. अनेक ठिकाणी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. या पदयात्रेत ठिकठिकाणी पथनाट्य आयोजित केली गेली. 'लोकायत संस्थेतर्फे' पथनाट्याद्वारे काँग्रेसच्या योजनांची माहिती दिली गेली. याचे सूत्रसंचालन कोथरूड ब्लॉक अध्यक्ष रवींद्र माझिरे आणि यशराज पारखी यांनी केले. या पदयात्रेचे संयोजन माजी जेष्ठ नगरसेवक रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम यांनी केले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे संतोष डोख व दिपाली डोख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात शेकडो कार्यकर्त्यांसह कालच्या रॅलीत प्रवेश केला.

# युवकांनी उत्साहाने लोकशाहीच्या महाउत्सवात सहभागी व्हावे

- विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांचे आवाहन



राजदंड न्यूज नेटवर्क

**पुणे :** अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदार जागृतीचा संदेश देण्यासाठी रेखाटलेल्या भित्तीपत्रक चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते करण्यात आले. युवकांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या महाउत्सवात सहभागी व्हावे आणि इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन यावेळी डॉ. पुलकुंडवार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय व भारतीय कला प्रसारिणी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे, भारतीय कला प्रसारिणीचे पृथ्वीराज पाठक, प्राचार्य राहूल बळवंत उपस्थित होते.

डॉ.पुलकुंडवार म्हणाले, स्वातंत्र्यानंतर देशातील नागरिकांना मताधिकार मिळाल्याने मतदानाचा दिवस हा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाला लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होता यावे व पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. मतदानावेळी दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना घरातून मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. नागरिकांनीदेखील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस म्हणून साजरा न करता लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा करावा. समाजामध्ये बदल घडविण्याची ताकद तरुण पिढीमध्ये असून नवमतदारांनी प्रत्येक निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजवावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. पुलकुंडवार यांनी कलेच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकाला मतदानाचे आवाहन करणारे संदेश दिल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांच्या मनात निश्चितपणे मतदान करण्याची भावना निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. दिवसे म्हणाले, कला हे प्रभावी माध्यम असल्याने कलेच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत प्रभावीपणे संदेश पोहोचविता येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तयार केलली भित्तीपत्रके मतदारजागृतीसाठी उपयुक्त ठरतील. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या चित्रांतून मतदानाचा संदेश अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचेल. अन्य माध्यमांचा उपयोग करून ही कलाकृती विविध शासकीय कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सजग नागरिक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमात सहभागी व्हावे, असे सांगून प्रत्येक पात्र मतदाराने येत्या १३ मे रोजी मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन डॉ. दिवसे यांनी केले. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासनाकडून स्वीप उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे यांनी मतदान जनजागृतीसाठी स्वीप मार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

# भीम जयंतीनिमित्त सोलापुरात जी. एम. संस्थेची भव्य मिरवणूक

- पोलीस आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन





**सोलापूर :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंती निमित्त जी.एम.मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेतर्फे सालाबादप्रमाणे यंदा ही पारंपारिक वाद्यासह भव्य मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करुण काढण्यात आली.

या मिरवणूक मध्ये विशेष म्हणजे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून मानवांसह पशु पक्षांना प्राण्यांना देखील संविधानाच्या माध्यमातून संरक्षण दिले आहे हा संदेश देणारा भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा आपल्या चोचीमध्ये घेऊन पृथ्वीवर फिरत भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचे महत्त्व जगाला सांगत आहे असा देखावा सादर करण्यात आला आहे.

यावेळी सोलापूरचे पोलीस आयुक्त एम.राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त बोराडे, जी.एम.संस्थेचे संस्थापक बाबासाहेब वाघमारे, जी.एम.संस्थेचे दत्ता वाघमारे, उत्सव अध्यक्ष हर्षवर्धन बाबरे, पप्पु गायकवाड, राजु हौशेट्टी यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून

### इंडिया आघाडी सत्तेवर आल्यास...

उभे केली आहे. भाजपला राज्य घटना बदलायची आहे, त्यासाठी त्यांचे नेते ४०० पार म्हणत आहेत. मात्र, देशात मोदी विरोधी वातावरण आहे, पंतप्रधानांचा दांभिकपणा व खोटारडेपणा जनतेसमोर आलेला आहे. त्यामुळे निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर भाजप २०० पारही करू शकले नाही, हे कळेल. मत विभाजनासाठी भाजपकडून वंचित व एमआयएमचे उमेदवार निवडणुकीत उतरवले जात आहेत. मागच्या वेळी वंचित व एमआयएमची आघाडी होती, या निवडणुकीत ती नाही. आता संविधान बचावण्यासाठी मोदींचा पराभव गरजेचे आहे. ही निवडणुक संविधान व देश वाचवणारी आहे, त्यामुळे वंचित व एमआयएमच्या उमेदवारांना जनता मते देणार नाहीत. शेतकरी, युवक, महिला, कामगार व सामाजिक न्याय यावर आधारीत काँग्रेसचा जाहीरनामा आहे. शेतकऱ्याच्या कर्जमाफीवर स्वतंत्र आयोग असेल. आम्ही कर्नाटकातील पाचही आश्वासने पूर्ण केली आहेत. लोकसभेसाठी दिलेली देखील सर्व आश्वासने आम्ही पूर्ण करू, असेही चव्हाण म्हणाले. महाराष्ट्रात राजकीय परिस्थिती अस्थिर आहे. राज्यात आर्थिक व नैतीक भ्रष्टाचार आहे. फोडा फोडीचा लोकांना राग आलेला आहे. आमदार तिकडे गेलेले असले तरी जनता गेलेली नाही. त्यामुळे राज्यात महाविकास आघाडीला प्रचंड मोठा विजय मिळेल, असा विश्वासही चव्हाण यांनी व्यक्त केला. दरम्यान, दोन जागांबाबत तिढा निर्माण झाला. सांगलीची जागा काँग्रेसला मिळावी, तेथे विशाल पाटील यांना उमेदवारी मिळावी, यासाठी आम्ही शेवटपर्यंत आग्रही होतो. ती जागा आमची हक्काची आहे. मात्र आता निवडणुक सुरू झाल्याने सर्वांनी एकत्र येवून लढणे गरजेचे आहे, विशाल पाटील माघार घेतील आणि सांगलीतही गोड शेवट होईल अशी आम्हाला आशा आहे , असेही चव्हाण म्हणाले.

### हत्तीची विनापरवाना वाहतूक;...

ट्रकमधून हत्तीची वाहतूक होताना दिसून आली. याबाबत वाहतूकीची कोणतीही परवानगी नसल्याचे दिसून आले. त्यानुसार हत्तीला काल सायंकाळी सातच्या सुमारास वनविभागाने ताब्यात घेतले. आज संबंधितांवर गुन्हा नोंद करण्यात आला. वन्यजीव संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा नोद करण्यात आला. कारवाईत वनपाल राजाराम तिवडे, अजितकुमार दगडे, मानद वन्यजीव रक्षक अजितकुमार पाटील, सचिन साळुंखे यांचा सहभाग होता.

### शिरवळ येथे दोघांकडून गावठी...

आणि त्यांची शरीराची झडती घेतली. यातून त्यांच्याकडून एक लोखंडी स्टीलचे गावठी बनावटीचे पिस्टल, दोन जिवंत काडतूस आणि एक मोटारसायकल असा सुमारे १२०४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यानुसार दिपक संतोष पाटणे (वय २२ वर्षे, रा. चिंग ता. खंडाळा, जि. सातारा) आणि ओम सतिष कदम (वय १९ वर्षे, रा. लोणी ता. खंडाळा, जि. सातारा यांच्या विरोधात शिरवळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

### 'तू सर्वात चांगली सून आहेस..!'

असे सांगून स्वतःच्या कृत्याचे खापर माध्यमांवर फोडले होते.

या पार्श्वभूमीवर शरद पवार यांचेच एकेकाळचे सहकारी आणि काही दिवसांपूर्वीच शरद पवार यांनी घरी जाऊन ज्यांची भेट घेतली होती त्या माजी खासदार विदूरा उर्फ नाना नवले यांनी, सुनेत्रा पवार यांना, ''तू सर्वात बेस्ट सून आहेस'', असे प्रशस्तीपत्रक दिले. एवढेच नाही तर खूप आग्रह करून दोन घास तरी खाल्लेच पाहिजेत, असे सांगून जेवण करायला लावले. काही दिवसांपूर्वी सुनेत्रा पवार यांनीही नानासाहेब नवले यांची त्यांच्या पुण्याच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी आपला पाठिंबा सुनेत्रा पवार यांना दिला होता. आता शाब्बास सूनबाई म्हणत सर्वात सरस सून असल्याचे दिलेले प्रशस्तीपत्र महत्वाची घटना मानली जात आहे. दरम्यान, नानासाहेब नवले यांची नातसून जान्हवी सूमेश नवले यांनी नुकतेच णझडउ मधे यश प्राप्त केले. त्याबद्दल सुनेत्रा पवार यांनी जान्हवी यांचे कौतुक करत नवले कुटुंबीयांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

### अजित पवार सर्वात निर्लज्ज व्यक्ती

ही शिंदे यांची नाही तर ती तो एक गद्दार गट असल्याचे आरोप आदित्य ठाकरे यांनी केला आहे. त्यामुळेच त्यांना अर्ध्या जागा बदलाव्या लागत असल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातून चंद्रकांत खैरे यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यानिमित्त आयोजित रॅलीमध्ये आदित्य ठाकरे यांनी सहभाग घेतला.

# महात्मा गांधी लिखित 'सत्याग्रह विचार'च्या नव्या आवृत्तीचे दि. २४ एप्रिल रोजी प्रकाशन

**पुणे :** राष्ट्रपिता महात्मा गांधी लिखित 'सत्याग्रह विचार' या पुस्तकाच्या चौथ्या खंडाच्या नव्या आवृत्तीचा प्रकाशन समारंभ बुधवार,दि.२४ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता गांधी भवन(कोथरूड) येथे ज्येष्ठ विश्लेषक अशोक चौसाळकर यांच्याहस्ते होणार आहे.महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाचे अध्यक्ष डॉ.कुमार सप्तर्षी हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत.संयोजन समितीच्या वतीने अन्वर राजन,संदीप बर्वे आणि जांबुवंत मनोहर यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.

महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर त्यांचे विचार मराठीत यावेत यासाठी महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे संस्थापक अध्यक्ष मामासाहेब देवगिरीकर यांनी विशेष प्रयत्न केले.त्यातून 'सत्याग्रह विचार' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. प्रथमावृत्तीचे प्रकाशन मामासाहेब देवगिरीकर यांच्याहस्ते झाले होते.महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे द्वितीय अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांची प्रस्तावना या पुस्तकाला आहे.महात्मा गांधींच्या विचारांचे सार या पुस्तकात आहे. या पुस्तकाचे एकूण २० खंड आहेत. त्यातील चौथ्या खंडाच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन या कार्यक्रमात होणार आहे.

# भगवान महावीर जन्मकल्याणकनिमित्त विविध उपक्रम उत्साहात



**राजगुरुनगर (वा.) :** भगवान महावीर जन्मकल्याणकनिमित्त राजगुरुनगर शहरामध्ये रक्तदान शिबीर घेण्यात आली. यावेळी १७२ जणांनी रक्तदान केले. प्रत्येक रक्तदात्यास श्री वर्धमान स्वामी जैन श्रावक संघ, श्री मुनीसुव्रत स्वामी जैन श्वेतांबर संघ व लायन्स क्लब ऑफ राजगुरुनगर च्या वतीने भेटवस्तू देण्यात आले.

जैन सकल संघातर्फे शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी सर्व नागरिकांना जागृती महिला मंडळातर्फे प्रसाद वाटप करण्यात आला. प्रसिद्ध वक्ते अमोलजी चंगेडिया यांचे व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमानंतर अरिहंत पतसंस्थाच्या वतीने गौतमप्रसादीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी श्री वर्धमान स्वामी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अजय बलदोटा, श्री मुनीसुव्रत स्वामी जैन श्वेतांबर संघाचे अध्यक्ष संजय राठोड, अरिहंत नागरी पतसंस्थाचे अध्यक्ष सुशील शिंगवी, जैन धर्मार्थ हॉस्पिटलचे अध्यक्ष संतोष बोथरा, लायन्स क्लब ऑफ राजगुरुनगर चे अध्यक्ष नितीन दोंदेकर, सेक्रेटरी सागर गुगलिया, मा. अध्यक्ष विजय भन्साळी, मा. सरपंच प्रदीप कासवा, रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगर चे अध्यक्ष दत्ता रुके उपस्थित होते.

रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी मनीष बोरा, अमर टाटीया, मिलिंद आहेर, प्रशांत कर्नावट, कुणाल रावळ, कमलेश पोखर्ना, रमेश बोऱ्हाडे, सौरभ लुनावत, सागर बलदोटा, महेंद्र गुगलिया, अनिल गांधी, दिनेश बलदोटा, नीलम मुथा, चंदन खारिवाल, विशाल कासवा, सिद्धेश कर्नावट व जैन सकल संघ आणि लायन्स क्लब च्या सर्व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. तसेच चाकण ब्लड बँकेचे आकाश जगताप यांचे सहकार्य लाभले.

# जे गेलेत ते स्वार्थासाठी, कट्टर शिवसैनिक उद्धव ठाकरे यांच्यासोबतच - हनुमंत कंक

भोर/प्रतिनिधी

बारामती लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात महा आघाडीतील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक कुलदीप कोंडे गेली काही काळ आघाडी उमेदवार सुप्रियाताई सुळे यांच्या प्रचारात सक्रिय होते मात्र अचानक त्यांनी एकनाथ शिंदे गटात प्रवेश केल्याने त्यांच्या जाण्याने काहीही फरक पडणार नाही. भोर तालुक्यातील कट्टर शिवसैनिक सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत असून पक्षाच्या आदेशाचे पालन करत महाआ घाडी धर्माचे पालन करणार आहे. जे गेलेत ते स्वार्था साठी गेले असून तालुक्यातील कट्टर शिवसैनिक मात्र कुठेही गेला नसुन लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी ताकतीने सहभागी होता व राहणार आहे असे मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे भोर तालुका पश्चिम प्रमुख हनुमंत कंक यांनी व्यक्त केले.

भोर येथील श्रीमंत गंगूताई पंतसचिव वाचनालयाच्या सभागृहात रविवार (दि.२०) रोजी दुपारी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी उपतालुकाप्रमुख विजय भिलारे , तालुका संघटक शंकर जाधव, विकास बांदल, विष्णू दानवले, दशरथ पिलाने, अमोल बरदाडे, गोरख पवार,नीलेश बांदल, अनिल भेलके,अतुल अग्रे, प्रमोद जगताप, नारायण मोरे, शिवाजी शिंदे,लक्ष्मण प्रधान,काका काटकर, बापू मोरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# दि. २७ एप्रिल रोजी 'वसंत प्रभा' नृत्य कार्यक्रम

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'वसंत प्रभा' या नृत्य कार्यक्रमाचे आयोजन दि.२७ एप्रिल २०२४ रोजी करण्यात आले आहे. नेहा दामले, फाल्गुनी कुलकर्णी, ईशा छत्रे, ईश्वरी करपे यांचे नृत्य सादरीकरण या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. अर्पिता वैशंपायन (गायन), वेदांग जोशी(तबला), अमेय बिच्चू (हार्मोनियम), तुलसी कुलकर्णी (पढंत),पार्थ भुमकर (पखवाज), उमंग ताडफळे (सतार) हे साथसंगत करणार आहेत.

हा कार्यक्रम शनिवार, दि.२७ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे.हा कार्यक्रम विनामूल्य आहे.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २०४ वा कार्यक्रम आहे.भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी ही माहिती दिली.

# रविवार पेठ, भोरी आळी येथे दुकानामध्ये आग

## अग्निशमन दलाकडून आगीवर नियंत्रण



राजदंड न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज दिनांक २२''०४''०२४ रोजी पहाटे ०५''१० वाजता अग्निशमन दल नियंत्रण कक्षात ६८८ रविवार पेठ, भोरी आळी, रामसुख चेंबर्स येथे आग लागल्याची वर्दि मिळताच अग्निशमन दलाकडून मुख्यालय, नायडू, कसबा, गंगाधाम येथून एकुण ४ फायरगाड्या व १ वॉटर टँकर रवाना करण्यात आला होता.

घटनास्थळी पोहोचताच जवानांनी पाहिले की, एका इमारतीत तळमजल्यावर दुकानामध्ये मोठ्या प्रमाणात आग लागल्याचे पाहताच कुत्रिम श्वसन उपकरण (बी ए सेट) परिधान करत प्रथम या इमारतीत किंवा दुकानामध्ये कोणी अडकले आहे का, याची खात्री करुन चारही बाजूने आगीवर पाण्याचा मारा सुरू केला. दुकानामध्ये मोठ्या प्रमाणात मालाचा (ग्रॉसरी) साठा असल्याने व आजुबाजूला इतर दुकाने व रहिवाशी घरे असून आग इतरत्र पसरु नये, याची दक्षता घेत जवानांनी सुमारे तासाभरात आगीवर नियंत्रण मिळवत मोठा धोका दुर केला. धुराचे प्रमाण मोठे असल्याने दलाकडून एक्झॉस्ट ब्लोअरच (धूर बाहेर काढण्याचे यंत्र) वापर करून आजुबाजूला असणारया रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. घटनास्थळी आगीचे नेमके कारण समजले नसून सदर ठिकाणी सुदैवाने जखमी नाही. सदर व्यावसायिक इमारत ही तळमजला अधिक चार मजले असून या संपुर्ण इमारतीत विविध प्रकारची छोटी मोठी दुकाने आहेत. या आगीमध्ये शांती क्रॉकरी अँन्ड गिफ्ट आर्टिकल्स या दुकानाचे पुर्ण नुकसान झाले असून दुकानातील सर्व माल जळाला आहे.

अग्निशमन अधिकारी विजय भिलारे, पंकज जगताप, सुनिल नाईकनवरे तसेच वाहनचालक संदिप कर्णे, दत्तात्रय वाघ, अनिकेत ओव्हाळ, संदिप थोरात व जवान भाऊसाहेब चोरमले, भरत वाडकर, चंद्रकांत गावडे, आझीम शेख, दिगंबर बांदिवडेकर, गणेश कुंभार, गणेश लोणारे, संतोष अडाळगे, निकेतन पवार, अजय कोकणे, रिजवान फरास, रोहित मदनावाले, पंकज पाटील, अक्षय कांबळे यांनी सहभाग घेतला.

# 'ईद मिलन' मधून सर्वधर्मियांची स्नेह भेट!

## आझम कॅम्पसच्या भारतीय संगीत मैफिलीला प्रतिसाद



**पुणे :** हलक्या पावसाने हवेत आलेला गारवा,कार्यक्रमस्थळी करण्यात आलेला अत्तराचा दरवळ,सर्वधर्मीय, सर्वपक्षीय मान्यवरांची उपस्थिती - स्नेह भेटी आणि भारतीय संगीताची मधूर पेशकश यामुळे आझम कॅम्पस आयोजित ईद मिलन कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी,अवामी महाझ सामाजिक संघटना यांच्यातर्फे शनिवारी सायंकाळी ७ वाजता आझम कॅम्पस, (पुणे कँप) येथे हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. नुकत्याच झालेल्या रमझान महिन्याच्या उपवासाची समाप्ती, ईद -उल -फित्र (रमझान ईद) च्या निमित्ताने उपस्थितांनी शुभेच्छाची देवाण घेवाण केली.या उपक्रमाचे हे २५ वे वर्ष होते.

या ईद मिलन कार्यक्रमात 'यशलक्ष्मी आर्ट्स' च्या कलाकारांनी भारतीय संगीत मैफिलीत सुरेल रंग भरले. त्यात हिंदी चित्रपटातील शास्त्रीय संगीतावर,रागदारीवरील आधारित गाण्यांना चांगला प्रतिसाद मिळाला.राधिका अत्रे, महेश देशमुख यांनी बहारदार गीते सादर केली.आकाश सोळंकी यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तसेच डॉ. पी. ए. इनामदार युनिव्हर्सिटी चे कुलपती डॉ.पी.ए .इनामदार, आबेदा इनामदार, एस.ए.इनामदार, प्रा.इरफान शेख, शाहिद शेख, अफझल खान, साबीर शेख, मश्कूर शेख, वहाब शेख, वाहिद बियाबानी यांनी सर्वांचे स्वागत केले. आझम कॅम्पस परिवारातील सर्व संस्था,अवामि महाज सामाजिक संघटनेचे पदाधिकारी,सामाजिक, शैक्षणीक, सहकार, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

माजी पोलीस अधिकारी अशोक धिवरे,माजी आमदार मोहन जोशी, माजी मंत्री रमेश बागवे, कमल व्यवहारे, माजी आमदार दीप्ती चौधरी, वंचित बहुजन आघाडीचे लोकसभा उमेदवार वसंत मोरे, शिवसेनेचे संजय मोरे, माजी नगरसेवक गफूर पठाण, एमआयएमचे लोकसभा उमेदवार अनिस सुंडके, मुनव्वर कुरेशी, रशीद शेख, रफिक शेख,नीता परदेशी, इक्बाल अन्सारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# टँकरने पाणी घालुन द्राक्षबागा जगवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड

## तासगांव तालुक्यातील विदारक दृश्य

न्यूज नेटवर्क

दुष्काळ नावाचा राक्षस तासगांव तालुक्याच्या पुर्वभागातील शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसला आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटाला तोंड देत तासगांव तालुक्याच्या पुर्वभागातील शेतकरी टँकरने पाणी घालून द्राक्षबागा जगवण्यासाठी धडपडत आहे. या विदारक परीस्थितीने शेतकरी वैफल्यग्रस्त झाला असल्याचे भयानक चित्र तालुक्यात दिसत आहे.

निसर्गाची अवकृपा आणि लोकप्रतिनिधींची असंवेदनशीलता याच्या कचाट्यात तालुक्यातील शेतकरी अक्षरशः भरडला जात आहे. गेली कित्येक वर्षे तालुक्याला दुष्काळमुक्त करण्याच्या घोषणा प्रत्येक भाषणात ऐकवल्या गेल्या. निवडणुकांच्या तोंडावर सिंचन योजनांचे नारळ फुटले. अपवादाने काही भागातील पाण्याचा प्रश्न तुर्तास तरी मार्गी लागल्याचे दिसते आहे. परंतु तालुक्यातील सर्वाधिक द्राक्षशेती असलेल्या सावळज पुर्वभागातील शेतीच्या पाण्याची परीस्थिती अत्यंत गंभीर आहे. काही ठरावीक शेतकऱ्यांनी म्हैशाळ योजनेच्या गव्हाण उपसा सिंचन प्रकल्पातुन लाखो रुपये खर्च करुन पाईपलाईने पाणी आणुन द्राक्षबागा जगवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु छोट्या शेतकऱ्यांना ते पाणी आणणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. तर दुसरीकडे सिध्देवाडी तलाव व अग्रणी नदीच्या बाजुला असलेल्या शेतकऱ्यांना मात्र पाण्यासाठी अद्यापही टँकरवर अवलंबून रहावे लागते ही वस्तूस्थिती आहे.

सध्या तासगांव तालुक्यातील द्राक्षबागांचा हंगाम जवळपास संपला आहे. काही ठिकाणची द्राक्षे काढणी सुरु झाली आहे.परंतु बहुतांश भागात पाण्याआभावी अद्यापही द्राक्षबागांच्या खरड छाटण्या बाकी आहेत. सध्या द्राक्षपीकाला पाण्याची नितांत गरज आहे. एप्रिल महीना सुरु झाल्यामुळें वातावरणात उष्णता वाढली आहे. परीणामी बागाना पाण्याची जास्त आवश्यकता आहे.गव्हाण मधुन म्हैसाळ योजनेच्या बंधाऱ्यातुन टँकरने पाणी घालण्याची धडपड सावळज व परीसरात दिसुन येत आहे. तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या डोंगरसोनी गावातील पाण्याचे एवढे दुर्भिक्ष्य आहे की पाण्याअभावी गावातील ६० % बागांची पीक छाटणीच शेतकऱ्यांनी घेतली नाही. ज्या द्राक्षबागा सध्यस्थितीत आहेत त्यांना सरार्स टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. ३००० ते ३५०० रूपये प्रति टँकर दराने शेतकरी पाणी विकत घेतो आहे.

दरम्यान तालुक्यात टेंभु ,आरफळ,म्हैसाळ योजनेचे पाणी काही भागात दाखल झाले आहे. टेंभुच्या ५ व्या ट्प्प्यातुन सिध्देवाडी तलावातही थोड्याच दिवसात पाणी सोडण्यात येणार असल्याचे राजकीय व्यासपीठावरुन ऐकायला मिळत आहे. सिध्देवाडी तलावात पाणी आणुन तेच पाणी अग्रणी नदीला सोडण्याचे नियोजन असल्याचे संबंधित अधिकारी व पदाधिकारी सांगत आहेत. सध्यातरी सर्वच शेतकरी पाण्याची चातकाप्रमाणे वाट पहात आहेत. हक्काचे व कायमस्वरूपी पाणी मिळावे हीच एकमेव मागणी तालुक्यातील पुर्वभागाच्या शेतकऱ्यांची आहे. टँकरने पाणी घालून बागा जगवणे हे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. परंतु नाईलाजाने का होईना टेंभुच्या पाण्याच्या आशेने शेतकरी बागा जगवण्यासाठी धडपडत आहे. लोकप्रतिनिधींनी राजकीय ताकद लावुन ह्या योजना तडीस न्यावे हीच अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत नेत्यांकडून त्याबाबत मोठमोठी आश्वासने दिली जात आहेत. पण प्रत्यक्षात मात्र पाण्याचा थेंबही पूर्वभागाला अद्याप मिळाला नाही.

दरम्यान टेंभुच्या प्रस्तावित पाणी यायला अजुन थोडाफार अवधी आहे. तोपर्यंत पुणदी योजनेतुन सावळजच्या अग्रणी नदीत पात्रात पाणी सोडणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी पैसेही जमा केले आहेत. संबंधित विभागाने या भागातील पाण्याची भीषण टंचाई प्रामुख्याने लक्षात घेवुन पुणदी योजनेचे पाणी सावळज परीसराला तातडीने द्यावी अशी मागणी जोर धरत आहे.

शासनाकडून दुष्काळ जाहीर होवुन जवळपास ३ महीने झाले. तासगांव तालुक्यात मात्र दुष्काळी उपाययोजना अद्यापही सुरु झाल्या नाहीत. चाऱ्याअभावी मुक्या जनावरांची तडफड होत आहे. शासनाकडून दुष्काळग्रस्त भागात कोणतीही कामे सुरु नाहीत. गावागावांत पिण्याच्या पाण्याचेही दुर्भिक्ष्य आहे. शासनाने याकडे गांभिर्याने लक्ष घालावे ही मागणी वाढत आहेत. परंतु प्रशासन मात्र लोकसभा निवडणुकीच्या नियोजनात व्यस्त आहे त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कोणीच वाली नाही का? असा प्रश्न निर्माण होत आहे.

# नाशकात भीषण आग

## घरासह गोदामात ५० दुचाकी जळून खाक; लाखो रुपयांचं नुकसान

नाशिक : आज सकाळच्या सुमारास जुने नाशिक परिसरात एका घराला आग लागल्याची घटना घडली. जुने नाशिक परिसर म्हटला तर नाशिकमधील सर्वात जास्त गर्दीचा परिसर. मात्र जुनी नाशिक परिसरातील एका घराला आग लागली आणि घराशेजारी असलेल्या गोदामाला देखील आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आग इतकी भीषण होती, की परिसरातील घर आणि गोदाम संपूर्ण जळून खाक झालं आहे. गोदामातील तब्बल पन्नास दुचाकी या आगीमध्ये भस्मसात झाल्या आहेत. आगीमुळे संपूर्ण परिसरात धुराचे लोट पसरले होते. जुने नाशिक परिसरात या आगीमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं होतं. तात्काळ आग लागण्याची घटना स्थानिकांनी अग्निशमन दलाला कळवली.

जुने नाशिक परिसरात लागलेल्या आगीची बातमी नाशिक शहरात झपाट्याने पसरली. प्रशासनाने तात्काळ अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी पाचरण केले. अग्निशमन दलाने आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. काही वेळात





आग विझवण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आलं. घराला लागलेल्या आगीमुळे घर संपूर्णतः आगीत भस्मसात झाले आहे. तर घराशेजारी असलेल्या गोदामाला देखील आग लागल्यामुळे गोदामातील तब्बल ५० दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. या आगीत जवळपास लाखो रुपयांचं नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

जुने नाशिक परिसरात सकाळच्या सुमारास लागलेल्या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती, मात्र ही आग कशामुळे लागली हे अद्याप समजू शकलेलं नाही. आगीने रौद्ररुप धारण केल्यामुळे परिसरात धुराचे लोट पसरले होते. अग्निशमन दलाने तात्काळ आगीवर नियंत्रण मिळवत आग विझवली मात्र या आगीत घर आणि गोदामासह लाखोंचं नुकसान झालं आहे.

सुदैवानी आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तीन नागरिक किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. या आगीत मोठी आर्थिक हानी झाली आहे. दरम्यान, आगीच्या घटनांमध्ये नाशिक शहरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. दोन दिवसापूर्वी देखील सातपूर परिसरात एका भंगाराच्या गोदामाला आग लागली होती

# छत्रपती संभाजीनगरची जागा लढण्यावर विनोद पाटील ठाम

## - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली नागपुरात भेट

**नागपूर :** महायुतीकडून छत्रपती संभाजीनगरच्या जागेसाठी संदिपान भुमरे यांच्या नावाची घोषणा झाली असली तरी मराठा आरक्षणासाठी लढा देणारे विनोद पाटील यांनी या जागेचा आग्रह सोडलेला नाही. सोमवारी विनोद पाटील यांनी नागपुरात दाखल होत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. आपल्याला महायुतीकडून उमेदवारी मिळाली तर ही जागा लढणार आणि नाही मिळाली तरीही ताकतीने ही निवडणूक लढविणार, असे पाटील यांनी या भेटीनंतर स्पष्ट केले. पत्रकारांशी बोलताना पाटील म्हणाले, या जागेवर लढण्यासाठी मी इच्छुक आहे. त्यामुळे आता महायुतीने काय ते ठरवायचे आहे. येथील उमेदवारी मला मिळाली यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची इच्छा होती.

महायुती मधील दोन आमदार आणि एक राज्यसभा सदस्य यांचा माझ्या उमेदवारीला विरोध होता. आता उमेदवारी जाहिर झाली असली तरी या निर्णयावर पुनर्विचार होईल अशी मला अजूनही अपेक्षा आहे. मतदार संघाची सध्याची परिस्थिती पाहता माझ्याकडे विजयाचे गणित आहे.

ती चर्चा करण्यासाठी मी उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. या मतदार संघाची काय स्थिती आहे हे पुन्हा एकदा तपासले पाहिजे यासाठी ही भेट होती, असेही पाटील यांनी स्पष्ट केले.



# स्नेहा शिंदे एकाच वेळी लोकसेवा आयोगाच्या दोन्ही परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**कुरुंदवाड -** विद्यार्थ्यांनी जिवनात मोठे होण्यासाठी मोठी स्वप्ने पहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि सतत प्रयत्नांची गरज असते. राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांनी भौतिक सुविधांची कारणे न सांगता मिळविलेले यश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आदर्श घेण्यासारखे आहे असे प्रतिपादन येथील पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस यांनी केले.

फडणीस पुढे म्हणाले महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पारदर्शी कारभारामुळे अनेकांना उच्चपदस्त होण्याची संधी प्राप्त झाली आहे त्याकरता मात्र कठोर परिश्रम घेण्याची गरज असते शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठ्या संख्येने लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षेत यशस्वी होत आहेत ही खरी गुरुकिल्ली शिक्षणातून निर्माण होत असते



**स्नेहा शिंदेचा सन्मान करताना कुरुंदवाड पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस**

येथील अमन हॉलमध्ये आयोजित राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थी, विद्यार्थ्यांनींचा सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रतापराव शिंदे होते. इंचलकरंजी शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अनिल माने, डॉ. रविंद्र शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतून एकाच वेळी राज्यकर निरिक्षक व सहाय्यक गटविकास अधिकारी पदावर निवड झाल्याबद्दल तसेच या परिक्षेत यश मिळवून विविध पदावर निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलिस निरीक्षक अनिल माने, डॉ. रविंद्र शिंदे, नेहा शिंदे, आदींची भाषणे झाली.

कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष दादासो पाटील, जयपाल बलवान, विजय माळी, एस. डी. हळिंगळे, साधना मंडळाचे अध्यक्ष सदाशिव सुभेदार, पप्पू माणगांवे आदी उपस्थित होते.

# शिरोळ दुय्यम निबंधक कार्यालयात तुकडा बंदीचे नियम धाब्यावर बसवून खरेदी विक्री व्यवहार

## शासनाचा महसूल अधिकाऱ्याच्या खिशात जात असल्याची चर्चा

**शिरोळ :** १४ जुले २० २१ पासून राज्य शासन व उच्च न्यायालयाने जमिनीचे तुकडे पाडण्याला प्रतिबंध केला आहे या कायद्याचे सर्व नियम धाब्यावर बसवून शिरोळ दुय्यम निबंधक कार्यालयात गेल्या वर्षभरात. १००० ते १२०० पेक्षा जास्त तुकडा बंदीचे खरेदी कागद करून लाखो रुपयाची माया संबंधित अधिकाऱ्यांनी जमवून शासनाच्या तुकडा बंदी आदेशाला वाटाण्याच्या अक्षता लावल्याची चर्चा शिरोळ तालुक्यात सुरू आहे

शिरोळ दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी विक्रीचे दररोज मोठे व्यवहार सुरू असतात साधे खरेदी चिरीमिरी घेऊन केली जाते मात्र अडचणीचे असेल तर बेकायदेशीर खरेदी विक्री कायद्यात बसून मोठी आर्थिक मागणी करून तयार केली जातात अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे विशेष म्हणजे राज्य शासनाने २०२१साली तुकडा बंदी कायदा लागू केला हा कायदा संपूर्ण राज्यभर कडक पाळला जातो मात्र तुकडा बंदीचे सर्व नियम धाब्यावर बसून शिरोळ दुय्यम निबंधक कार्यालयात सरास तुकडा पाडून खरेदी विक्री केल्याची व हे करण्यासाठी पाच हजार रुपयांपासून ते ३५ ४० हजार रुपये पक्षकारांच्याकडून घेतले जात असल्याचे पक्षकारातून बोलले जात आहे

विशेष म्हणजे ही सर्व नियम धाब्यावर बसून बिन बोभाटपणे पार पाडली जात आहेत पैसे देऊन काम झाल्याचे समाधान पक्षकारांना तर पैसे मिळाल्याचे समाधान अधिकाऱ्यांना अशी प्रकार असला तरी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल मात्र बुडत चालण्याचे उघड उघड बोलले जात असल्याचे समजते

तुकडा बंदी आदेश डावलून खरेदी विक्री व्यवहार पूर्ण केले म्हणून नोंदणी महानिरीक्षक श्रावण हर्डीकर यांनी राज्यातील दोन अधिकारी निलंबित केले आहेत इथे मात्र सर्रास तुकडा बंदी चे सर्व नियम धाब्यावर बसवून मोठ्या आर्थिक अमिषा पोटी संगणमताने पक्षकारांची लूट सुरू असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बडवला जात आहे यांच्यावर काय कारवाई होणार असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे

# महापालिकेकडून सरकारी धोरणाचे उल्लंघन केले जात असल्यास काय करणार? उच्च न्यायालयाची विचारणा

**मुंबई :** सर्वसामान्यांकडून कोणत्याही बाबींचे पालन केले जात नसेल तर त्यांच्यावर निर्बंध घातले जातात अथवा कारवाईचा बडगा उगारला जातो. परंतु, शासनाच्या धोरणाची मुंबई महापालिका किंवा अन्य कोणाही महापालिकेकडून अंमलबजावणी केली जात नसेल, तर काय कारवाई करणार, असा प्रश्न उच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकारला विचारला. तसेच, त्याबाबतची भूमिका पुढील सोमवारपर्यंत स्पष्ट करण्याचे आदेश दिले. झोपडपट्ट्यांतील सफाईचे कंत्राट बेरोजगारांच्या संस्थेला द्यावे, असे राज्य शासनाचे धोरण आहे. असे असताना महापालिकेने मुंबई शहर बेरोजगार सेवा सहकारी संस्थेऐवजी अन्य संस्थांना कंत्राट देण्याच्या उद्देशाने निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. मुंबई महापालिकेची ही कृती सरकारच्या धोरणाविरोधात आहे. त्यामुळे, अशा स्थितीत राज्य सरकार काय कारवाई करणार ? अशी विचारणा मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने केली. अशा स्थितीत महापालिकेला कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल या सरकारी वकिलांनी केलेल्या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने त्याबाबत संताप व्यक्त केला.

# अपक्ष निवडणूक लढविण्याच्या निर्णयावर विशाल पाटील ठाम

## महाविकास आघाडी मधील अस्वस्थतेत वाढ

**सांगली, :** काँग्रेस पक्षाकडून व्यापक हिताचे आवाहन करण्यापासून कडक कारवाईचा इशारा देण्यापर्यंत सर्व उपायांचा अवलंब करूनही सांगली लोकसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर काँग्रेसचे नेते विशाल पाटील ठाम आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीतील अस्वस्थता मात्र कमालीची वाढली आहे.

छत्रपती शाहू महाराज यांना उमेदवारी देण्यासाठी कोल्हापूरची जागा सोडण्याच्या बदल्यात सांगलीच्या जागेवर दावा करून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जागावाटप पूर्ण होण्यापूर्वीच डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांची उमेदवारी ही जाहीर करून टाकली. वास्तविक सांगली हा काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जातो.

सांगलीतून विशाल पाटील आणि विश्वजीत कदम हे दोन मोठे नेते निवडणूक लढविण्यास उत्सुक होते. अखेरच्या क्षणापर्यंत मुंबई आणि दिल्लीपर्यंत जाऊन त्यांनी सांगलीची जागा मिळवण्याची खटपट केली. मात्र काँग्रेस श्रेष्ठींनी त्यांना दात दिली नाही.

सुरुवातीपासून विशाल पाटील यांचे समर्थन करीत असलेले विश्वजीत कदम श्रेष्ठींच्या इशाऱ्यानंतर नरमल्याचे चित्र आहे. महाविकास आघाडीच्या व्यापक हितासाठी अपक्ष उमेदवारी मागे घेण्याचा सल्ला त्यांनी विशाल पाटील यांना दिला आहे. मात्र, त्यांच्यासह अनेक काँग्रेस नेत्यांची शिष्टाई, सल्लामसलत याचा कोणताही परिणाम विशाल पाटील यांच्या निर्णयावर झालेला नाही. एवढेच नव्हे तर पक्षश्रेष्ठींनी पक्षांतर्गत कारवाईचे शस्त्र उपसल्यावरही विशाल पाटील यांनी त्याला दात दिलेली नाही. त्यामुळे सांगली लोकसभा मतदारसंघात तिरंगी निवडणूक होणार हे निश्चित झाले आहे.

# सांगलीत लोकसभा निवडणुकीवर राहणार ५७ चित्रीकरण पथकांची नजर



**सांगली :** सांगलीलोकसभेसाठी ७ मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. प्रचारादरम्यान सभा, बैठका, रॅली, कॉर्नर सभा आदींवर लक्ष ठेवण्यासाठी ५७ व्हिडीओ चित्रीकरण पथके जिल्हाभर तैनात केली जाणार आहेत.

आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन होतेय की नाही, प्रचारासाठी वापरण्यात येणारी वाहने, मनुष्यबळ, झेंडे, फुले-हार आदींचे चित्रीकरण पथकांद्वारे करण्यात येणार आहे. जिल्ह्यात १८ लाख ६५ हजार ९६० मतदार आहेत. २५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सध्या प्रचाराचा जोर वाढत असून, उमेदवारांनी लोकसभा क्षेत्र पिंजून काढण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. दुसरीकडे प्रशासनानेही तयारी पूर्ण केली आहे.एक दिवसाचे प्रशिक्षण

**विधानसभा मतदारसंघ - व्हिडीओ चित्रीकरण पथके**

| | |
|---|---|
| मिरज | ६ |
| सांगली | ७ |
| पलूस-कडेगाव | ७ |
| खानापूर | १० |
| तासगाव-क.महांकाळ | ८ |
| जत | ७ |
| इस्लामपूर | ५ |
| शिराळा | ७ |
| एकूण | ५७ |

जिल्हाभरात तैनात केलेल्या चित्रीकरण पथकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यामध्ये चित्रिकरणाचे महत्त्व लक्षात आणून दिले आहे. कोणकोणत्या हालचाली, कार्यक्रम, सभा, बैठका, प्रचार आदींमधील मनुष्यबळ, त्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य आदींबाबत पथकांना मार्गदर्शन करण्यात आले.विविध प्रक्रियांचे चित्रीकरण

लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सध्या जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या कालावधीपासून तर मतदान प्रकिया पार पडेपर्यंत ठिकठिकाणच्या राजकीय, सामाजिक हालचाली या चित्रीकरणाद्वारे टिपण्यात येणार आहेत.

याशिवाय उमेदवारांचा प्रचार, सभा, बैठका, कॉर्नर सभा, रॅली, त्यातील वाहने, प्रचारातील मनुष्यबळ, सभा-बैठकांसाठी वापरण्यात येणाऱ्या खुर्च्या, फुले-हार आदींचे व्हिडीओ चित्रीकरण या पथकाद्वारे केले जाणार आहे.चित्रीकरण पुरावा म्हणून नोंदविला जाणार

एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचे पालन झाले की नाही, त्याची शहानिशा करण्यासाठी चित्रीकरणाचा पुरावा विचारात घेतला जाणार आहे. याशिवाय उमेदवाराने घेतलेल्या परवानगीपेक्षा जास्त वाहने, खुर्च्या, बॅनर्स, झेंडे वापरले असल्यास त्यासाठी चित्रीकरणाचा पुरावा खर्चाचा हिशेब देताना विचारात घेतला जाणार आहे. उमेदवाराने दिलेला खर्च कमी आढळल्यास या चित्रीकरणाच्या वस्तुस्थितीनुसार खर्चाचा हिशेब देण्यास उमेदवाराच्या लक्षात आणून देण्यात येणार आहे.

## श्री हनुमान जन्मोत्सवनिमित्त होळीचागाव येथे विविध कार्यक्रम

**वडूज :** श्री हनुमान रथोत्सव व हनुमान जन्मोत्सव निमित्त होळीचागाव ता खटाव येथे विविध धार्मिक व मनोरंजनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये बुधवार १७ एप्रिल ते मंगळवार २३ एप्रिल अखेर ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह, मंगळवार २३ रोजी सकाळी श्री हनुमान जन्मकाळ,त्यानंतर ह.भ.प. भूषण गणेशनंद महाराज धुमाळ (माळशिरस) यांचे काल्याचे किर्तन, सायंकाळी ६ वाजता श्री हनुमान देवाची पालखीतून भव्य मिरवणूक व छबीना,रात्री भव्य नृत्यस्पर्धा, बुधवारी २४ रोजी सकाळपासून श्री हनुमान देवाची रथातून भव्य मिरवणूक,लोकनाट्य तमाशा,रात्री ऑकेस्ट्रा झंकार बिट्स, गुरुवार २५ रोजी कुस्त्यांचा भव्य आखाडा प्रथम क्र बक्षीस ७५000/- द्वितीय-४१000/- तृतीय २५000/- चतुर्थ १५000/- पाचवे ११000/- सहावे ७000/- शुक्रवार २६ रोजी बैलगाड्यांच्या जंगी शर्यती होणार असून यामध्ये प्रथम क्रमांक दुचाकी ७५000, द्वितीय ४१000 रुपये, तृतीय ३१000/ चतुर्थ २१000 आदी बक्षीसे व ढाल देण्यात येणार आहे.

## वाई शहरातील भगवान महावीर जन्म कल्याणक उत्साहात संपन्न

**वाई :** वाई शहरातील जैन श्वेतांबर समुदायाच्या वतीने आज भ. महावीर स्वामी याचा जन्म कल्याणक सोहळ्या निमित्त प्रसिद्ध प्रवचनकारक प. पु मुनिराज मुक्ती भुषण विजयी म सा च्या उपस्थितीत समाज बांधवांनाकडुन महावीर यांच्या प्रतिमेस सकाळी ६.३० ला विविध मंत्रोच्चारात विधिवत अभिषेक करण्यात आला.

वाईमध्ये उपाश्रयमध्ये विराजमान असलेले प्रख्यात प्रवचनकारक प.पु मुनिराज मुक्ती भुषण विजयी म सा व ३ साधु भंगवत याच्या सान्निध्यात समाज बांधवांच्या उपस्थितीमध्ये महावीर स्वामीचे विविध पैलूवर व्याख्यान द्वारे समाज प्रबोधन करण्यात आले.

या नंतर भ.महावीर स्वामी याची प्रतिमा पालखी व रथामध्ये विराजमान करून सर्व समाज बांधवांच्या सोबत वाजत गाजत बॅण्ड ढोलपथकासह साधुभंगवताच्या समावेशासह भव्य वरघोडा काढण्यात आला. यावेळी सर्व समाज बांधवांनी पारंपारिक वेषभूषा परिधान करून वेगवेगळ्या धार्मिक घोषणा देत शाततेमय वरघोडा निघाला.

यावेळी जैन बांधवांनी मिष्टान्नै पाकिटे वरघोडयात वाटून आपल्या आनंदात स्थानिकांना सामावून घेतले.

# लोकसभेच्या आखाड्यात कोणते पैलवान ठरणार 'बाहुबली'

## राज्यातील चार नामांकित मल्ल रिंगणात, लढतीकडे कुस्तीशौकिनांचे लक्ष

**औंध/ फिरोज मुलाणी**

लोकसभा निवडणुकीचे मैदान आता चांगलेच तापले आहे. खासदार केसरीचा किताब जिंकण्यासाठी राज्यातील चार नामांकित मल्ल मैदानात उतरले आहेत. प्रतिस्पर्ध्याला धोबीपछाड देऊन लोकसभेच्या आखाड्यात कोण बाहुबली ठरणार याची सर्वांना उत्सुकता लागली आहे.






पैलवान आणि राजकीय क्षेत्राचा अगदी जवळचा संबंध आहे. कुस्ती क्षेत्रातून निवृत्त झाल्यावर अनेक मल्लांनी राजकीय आखाड्यात उडी घेऊन आपले नशीब आजमावले आहे. लाल मातीचा आखाडा गाजवल्यावर अनेक मल्लांची राजकीय इनिंग देखील कमालीची यशस्वी ठरली आहे. लोकसभा निवडणुकीत सुध्दा राज्यातील चार नामवंत मल्ल शड्डू ठोकून आखाड्यात उतरले आहेत.

८० च्या दशकात सांगलीच्या भोसले व्यायामशाळेत बसलींग करजगी, मल्ल सम्राट विष्णूपंत सावर्डेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचे धडे गिरवलेल्या संजय काकांनी राजकारणात देखील मोठा पल्ला गाठला आहे. विधानसभेच्या मैदानात स्वर्गीय आर. आर. पाटलांशी त्यांनी अनेकदा निकराची झुंज दिली होती. विधानपरिषद गाजवल्या नंतर २०१४ साली काकानी सांगली लोकसभेचे मैदान मारल्यानंतर मात्र मागे वळून पाहिले नाही. २०१९ मध्ये त्यांनी विजयाचा डबलबार उडवला होता. आता ते हट्रिक मारण्याच्या तयारीत आहेत. त्यांचा विजयी वारु रोखण्यासाठी यावेळी डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील त्यांच्यासमोर उभे ठाकले आहेत. अनुभवी संजय काकानी अडचणीच्या क्षणी धोबीपछाड देऊन विरोधकांना आसमान दाखवले आहे. यंदा त्यांच्या लढतीकडे , सर्वांचे लक्ष लागले आहे.

भाळवणीचे सुपुत्र चंद्रहार पाटील यांनी न्यू मोतीबाग तालमीत हिंदकेसरी गणपतराव आंधळकर आणि राष्ट्रकुल पदक विजेते राम सारंग यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीत जबरदस्त कामगिरी करून दाखवली आहे. २००७ सालीच नवख्या चंद्रहारने राजकारणातील कसलेले मल्ल रामराव दादांचा पराभव करून जिल्हा परिषदेचे मैदान मारले होते. राजकारणात एंट्री करुनही त्यांनी लाल मातीची नाळ सोडली नाही. २००७ आणि २००८ साली महाराष्ट्र केसरीचा दुहेरी मुकुट सांगली जिल्ह्याला मिळवून दिला होता. लाल मातीत डबल महाराष्ट्र केसरी पदाचा बहुमान प्राप्त केला असला तरी यंदा राजकीय आखाड्यात खासदार केसरी किताब मिळवण्यासाठी चंद्रहार पाटील यांनी यंदा महाविकास आघाडी कडून लोकसभेसाठी दंड थोपटले आहेत. सध्या तरी त्यांची राजकीय पाटी कोरी आहे. विद्यमान खासदार संजयकाका पाटील यांना रोखण्यासाठी त्यांची खडाखडी सुरू झाली आहे.

### जयकुमार वस्तादाच्या भूमिकेत

**वसंतदादा कुस्ती केंद्राचे नामांकीत मल्ल आ. जयकुमार गोरे यांनी २०१९ साली राष्ट्रीय कॉंग्रेसचे सातारा जिल्हाध्यक्ष रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना माढा लोकसभा मतदारसंघाच्या आखाड्यात उतरवले होते. निवडणुकीची सगळी सूत्रे आपल्या हातात ठेवत त्यांनी परफेक्ट नियोजन करून संजय मामाला माती चारुन मैदान मारले होते. यंदा देखील आ. जयकुमार गोरे पुन्हा एकदा वस्तादाच्या भूमिकेत उतरले आहेत. माढ्यात आपल्या शागीर्दाच्या विजयासाठी त्यांनी कंबर कसली असून विजयाचा डबल बार काढण्यासाठी ते डावपेच लढवत आहेत. अर्थात बारामतीच्या वस्तादाचे कडवे आव्हान आ. गोरे यांच्या पुढे उभे आहे.**

विदर्भ केसरी किताब विजेते विदर्भातील नामांकित मल्ल खा. रामदास तडस यांनी राजकीय आखाड्यात चांगलाच जम बसवला आहे. नगरपालिकेपासून राजकीय इनिंगला सुरवात केलेल्या तडस यांनी व्हाया विधानपरिषद मार्गे दिल्लीच्या तख्तावर झेंडा फडकवला आहे. देवळी नगरपालिकेचे नगराध्यक्ष, दोन वेळा विधानपरिषद आमदार झाल्यावर तडस यांनी २०१४ साली वर्धा लोकसभा आखाड्यात उतरून कमळ फुलवले. २०१९ साली देखील लोकसभा निवडणुकीत विजयाची पताका कायम ठेवली होती. यंदा महायुतीच्या माध्यमातून हटहट्रीक करण्यासाठी त्यांनी कंबर कसली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेत संघटनात्मक काम केल्यानंतर सध्या कुस्तीगीर संघाची धुरा ते सांभाळत आहेत.

### पैलवानाकडे अचूक निर्णयक्षमता

**पैलवान अतिशय धाडसी असतात. त्यांच्याकडे अचूक निर्णयक्षमता असते. लढतीत निर्णायकक्षणी डाव मारुन प्रतिस्पर्धी मल्लाला ते चितपट करतात. अनेकजण पैलवानाचा मेंदू गुडघ्यात असे हिणवतात. संयम ठेवून पराजयाचे विजयात रुपांतर करण्याची क्षमता पैलवानाकडे असते. अटीतटीच्या लढतीत पैलवानांनी दिग्गज नेत्यांना माती चारुन राजकीय मैदानात देखील बाजीगर असल्याचे दाखवून दिले आहे.**

कसबा बावडा येथील शासकीय कुस्ती केंद्रात आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षक उत्तमराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मुरलीधर मोहोळ यांनी कुस्तीतील डावपेच आत्मसात केले. जिद्द लढण्याची क्षमता आणि संघटनात्मक कामाच्या जोरावर पुणे महानगर पालिकेच्या राजकीय आखाड्यात त्यांनी बाजी मारली आहे. सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहराचे महापौरपदाचा यशस्वी कारभार करताना सर्वांना बरोबर घेऊन कोरोनाचा देखील खंबीरपणे सामना केला. पुण्यात कुस्तीगीर संघाच्या माध्यमातून महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे नेटके आयोजन करून राजकीय दिग्गज नेत्यांचे त्यांनी लक्ष वेधून घेतले होते. यंदा महायुतीचे तिकीट मिळवून खासदार केसरी किताबासाठी ते राजकीय आखाड्यात उतरले आहेत.

## नैसर्गिक आपत्तीनंतर महाबळेश्वरमधील रस्ते झाले टकाटक !

**राजदंड / महाबळेश्वर**

तीन वर्षांपूर्वी आलेल्या नैसर्गिक आपत्तीनंतर महाबळेश्वरकडे येणाऱ्या सर्वच रस्त्यांची अवस्था बिकट झाली होती. त्यामुळे महाबळेश्वरचा प्रवास म्हटले की, अंगावर काटा येत होता; परंतु आता सार्वजनिक बांधकाम विभागाने आपली कामगिरी चोख पार पाडली असून हंगामापूर्वीच महाबळेश्वरकडे येणारे सर्वच रस्ते आता टकाटक केले आहेत, त्यामुळे महाबळेश्वरची सहल आणि प्रवास सुखकर आणि आनंददायक होणार आहे.

पाचगणी ते कुंभरोशी या ३५ कि मी अंतरा मधील २ कि मी अंतर वगळता ३३ कि मी रस्त्यांचे डांबरीकरण पूर्ण झाले आहे. याच भागात मेटगुताड या गावातील ६०० मीटर रस्ता हा सिमेंट कॉंक्रिटचा करण्यात आला असुन हा रस्ता लवकरच सुरू करयात येईल याच रस्त्यावर वेण्णालेक जवळ ८ मिटर रूंदीच्या पुलाचे काम युध्दपातळीवर सुरू असुन पावसाळ्या पूर्वी हे काम पूर्ण करण्यात येणार आहे महाबळेश्वर ते तापोळा या २६ कि मी पैकी सात कि मी रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे पुढील १२ कि मी रस्त्याचे रूंदीकरणाचे काम पूर्ण झाले आहे या भागाचे डांबरीकरणाचे काम लवकरच पूर्ण केले जाईल उरलेले सात कि मी रस्त्याचे काम पावसाळया



पूर्वीच पूर्ण करण्यात येणार आहे महाबळेश्वर तापोळा या रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरणामुळे कायापालट झाला असुन या सुसाट रस्त्यामुळे प्रवासात वेळेची बचत झाली आहे याच रस्त्यावर तळदेव या गावात देखिल मेटगुताड प्रमाणे सिमेंट कॉंक्रिटचा रस्ता तयार करण्यात आला आहे

महाबळेश्वरकडे येणारे प्रमुख रस्ते वगळता सार्वजनिक बांधकाम विभागाने तालुक्याच्या ग्रामिण भागातील रस्ते देखिल चकाचक केले आहेत वाडा कुंभरोशी ते तापोळा या ६० कि मी रस्त्यां पैकी ३९ कि मी रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे मुख्य रस्त्या पसुन हातलोटला जाणारा सहा कि मी रस्त्याचे देखिल डांबरीकरण पूर्ण करण्यात आले आहे चतुरबेट दाभे खरोशी रेनोशी आहीर दरे ते उचाट या ४३ कि मी लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे अशी माहीती सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अंभियंता अजय देशपांडे यांनी दिली.

## लग्नाची दागिने खरेदीसाठी आजही 'चंदूकाका सराफ'!

**सातारा :** १८२७ पासून बारामतीची सुवर्णपेढी म्हणून ओळखले जाणारे चंदुकाका सराफ ! तेव्हांपासून आजपर्यंत जसा काळ बदलला, तशा पध्दती बदलल्या, डिझाईन्स बदलत गेल्या आणि ट्रेंडही बदलले. या बदलत्या काळाला अनुसरून वाटचाल करणाऱ्या चंदुकाका सराफ ह्या सुवर्णपेढीला संपूर्ण महाराष्ट्रात आजही दागिने खरेदीसाठी प्रथम प्राधान्य दिलं जातं.

याच चंदुकाका सराफ ह्यांनी आता आजच्या काळानुरूप विवाह दागिन्यांची नवीन श्रेणी आता सादर केली आहे. यामध्ये नववधूच्या

चंदुकाका सराफ™ SINCE 1827
बारामतीची सुवर्णपेढी!
TOLL FREE 1800 267 8555

खास अलंकारांसह वऱ्हाडी मंडळींसाठी देखील कलात्मक दागिने घडविण्यात आले आहेत. ह्या विवाह दागिन्यांमध्ये पारंपारिकता व आधुनिकता यांचा सुरेख संगम साधण्यात आलेला आहे. हराम नेकलेस, चोकर, कलर स्टोन प्लस डायमंड नेकलेस, पार्टीवेअर कॉकटेल रिंग्ज अशा अनेक नावीन्यपूर्ण दागिन्यांचा समावेश ह्या नवीन श्रेणीमध्ये तुम्हांला पाहावयास मिळणार आहे.

परंपरा, शुद्धता, विश्वास, पारदर्शकता, नावीन्य ही मूल्ये आत्मसात करणाऱ्या चंदुकाका सराफ यांनी महाराष्ट्रात ग्राहकांशी विश्वासाचे नाते जोडले आहे. जुन्या पिढीपासून नव्या पिढीपर्यंत सर्वांना आवडतील अशी ही विवाह श्रेणी आहे. चंदुकाका सराफ सर्व शोरूममध्ये ही श्रेणी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तेव्हा ज्यांच्या घरात लग्नकार्य ठरले आहे त्यांनी आपल्या जवळच्या शोरूमला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन चंदुकाका सराफ यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

## जागतिक अर्थतज्ज्ञ डॉ.आंबेडकर यांच्यावर कॉ. अभ्यंकर यांचे व्यख्यान संपन्न

**राजदंड / सातारा**



येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील सभागृह, डी. जी. कॉलेज येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त आणि ''दि प्रॉब्लेम, ऑफ रुपी- इट्स ओरिजन अँड इट्स सोल्यूशन'' या ग्रंथाच्या शताब्दी पूर्तीच्या पार्श्वभूमीवर, ''जागतिक अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर- सिद्धांत वास्तव आणि विपर्यास'' या विषयावर आंबेडकरी अर्थशास्त्राचे अभ्यासक कॉ. अजित अभ्यंकर यांचे अभ्यासपूर्ण व सविस्तर असे मार्गदर्शन झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती वाचून,विधायक कार्याने आणि वैचारिक कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. या वैचारिक कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, प्राध्यापक, प्राध्यापिका, अध्ययनार्थी, डॉ. राजशेखर निलोलु, ज्येष्ट सामाजिक कार्यकर्ते रमेश इंजे, डॉ. गोरख बनसोडे, पी. डी. साबळे, शिरीष जंगम, परवेज सय्यद, ऍड. कुमार गायकवाड, प्रा. सी. एन. कांबळे, हरिभाऊ जाधव, प्रा. सौ. प्रमिला सारगडे, ऍड. नंदकुमार मोहिते, परवेज सय्यद, शिरीष जंगम, विनायक आफळे, नारायण जावळीकर, अनिल पोळ, भगवान रणदिवे, शाहिर प्रकाश फरांदे, दत्ता राऊत, प्रकाश खटावकर, दिलीप सावंत, अनिल वीर आदी विविध क्षेत्रातील मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

जयंती विचारांची झाली पाहिजे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजून घेण्याची आज काळाची गरज आहे. याच हेतूने कॉ. अभ्यंकर यांचे व्याख्यानाचे नियोजन युवाग्राम संस्था यांच्यामार्फत गणेश वाघमारे यांनी करून ठेवले होते. फुले शाहु आंबेडकर विचार प्रसारक मंडळाचे प्रा. रोहिदास जाधव यांनी प्रास्ताविक केले. विशाल कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजय कुंभार यांनी आभार मानले.

## वडूजची जय हनुमान तालीम घडवतेय चिमुकल्यांचं भवितव्य !

**वडूज / डॉ. विनोद खाडे**

खटाव तालुक्यातील वडूज येथील अनेक वर्षे बंद अवस्थेत असलेल्या कुस्ती तालमीला अथक प्रयत्नातून मागील ५ ते ६ महिन्यापूर्वी नगरपंचायतचे मुख्याधिकारी, नगराध्यक्ष आणि नगरसेवक यांच्या सहकार्याने उर्जीतावस्था प्राप्त झाली. आज मितीला या तालमीत वडूजसह परिसरातील सुमारे ७० ते ८० लहान मोठे मल्ल सागर काळे, फौजी, भरत चव्हाण, अजित पाटोळे आदी जाणकार वस्तादांकडून परिपूर्ण प्रशिक्षण घेत आहेत. यामध्ये महिला मल्लही आहेत. मागील काही दिवसांपासून या तालमीतील अनेक विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणी झालेल्या कुस्ती मैदानात अनेक बक्षिसं मिळवली आहेत. खऱ्या अर्थाने ही तालीम वडूजसह परिसरातील विद्यार्थ्यांना नामांकित मल्ल घडवणारी जननी म्हणणं वावगं ठरणार नाही. अशा परिस्थितीमध्ये एक आदर्श पिढी हुतात्मा नगरीत निश्चितचं

- **वडूजसह परिसरातील अनेक विद्यार्थी घेत आहेत पैलवानकीचे धडे**
- **चिमुकल्यांना खरी गरज -मॅट आणि व्यायाम साहित्याची**
- **नगरपंचायत प्रशासनाचं होतंय मोठं सहकार्य**




घडणार आहे.

नगरपंचायतच्या वतीने या तालमीला खूप सहकार्य होतंय, मात्र या ठिकाणी मातीतली कुस्ती होवू शकते परंतु हेच मल्ल जेव्हा राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्पर्धेसाठी जातील तेव्हा त्यांना अनेक अडचणी येवू शकतात, कारण या ठिकाणी मॅट आणि व्यायाम साहित्य मिळणं काळाची गरज आहे. त्याच बरोबर पाण्याची सोय होणं आवश्यक आहे आणि सर्वात महत्वाचं म्हणजे विद्यार्थ्यांना नामांकित मल्ल बनवणे ही काय सोपी गोष्ट नाही, तर त्यासाठी तांत्रिक सोयी सुविधा उपलब्ध असणं आवश्यक आहे.

आजच्या महागाईच्या काळात तालीम चालवण्यासाठी काही दानशूर मंडळी सहकार्य करत आहेत परंतु शासन पातळीवर आणि लोकसहभागातून सहकार्य मिळालं तर ही पिढी हुतात्मा नगरीं वडूजचं नाव देशाच्या इतिहासात निश्चितचं कमवील हे मात्र नक्की!

# लोकसभेची निवडणूक ही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठीची म्हणून आगळीवेगळी

## माजी मंत्री आ. बाळासाहेब पाटील; आ. शशिकांत शिंदे म्हणजे कामगारांसाठी लढणारा लढवय्या

**राजदंड / कराड**

२०२४ ची लोकसभेची निवडणूक ही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठीची निवडणूक आहे म्हणूनच ही आगळीवेगळी निवडणूक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे, असे प्रतिपादन राज्याचे माजी सहकार मंत्री आमदार बाळासाहेब पाटील यांनी केले. दरम्यान, सातारा लोकसभा मतदारसंघात इंडिया आघाडीकडून उमेदवारी देण्यात आलेले आमदार शशिकांत शिंदे हे यशवंत विचार जपणारे, कामगारांसाठीचे लढवय्या नेतृत्व आहे. त्यांना विजयी करण्याचा कराडमधून निर्धार करूया, असे आवाहनही आमदार पाटील यांनी केले.

४५ सातारा लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार आमदार शशिकांत शिंदे यांच्या निवडणूक प्रचारार्थ आमदार बाळासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखाली कराड शहरातील यशवंत विचारांच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत आमदार बाळासाहेब पाटील बोलत होते. माजी नगराध्यक्ष जयवंत पाटील, माजी नगराध्यक्ष विद्याराणी साळुंखे, एडवोकेट सतीश पाटील, माजी उपनगराध्यक्ष सुभाषराव डुबल, सुभाषराव पाटील, माजी नगरसेवक अरुण जाधव, सौरभ पाटील, कांतीलाल शेठ, मझहरभाई कागदी, जयंतकाका पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार बाळासाहेब पाटील म्हणाले, सातारा लोकसभा मतदारसंघात इंडिया आघाडीच्यावतीने उमेदवारीसाठी सर्वे घेण्यात आला. त्यानंतर श्रीनिवास पाटील यांनी तब्येतीमुळे असमर्थता दर्शवली, मलाही विचारण्यात आले होते मात्र सह्याद्री साखर कारखान्याचा विस्तार आणि सहप्रकल्पाची कामे आपण हाती घेतली असून लोकांनी दिलेली जबाबदारी आपल्याला पूर्ण करावयाची आहे त्यामुळे मी ही उमेदवारीसाठी इच्छुक नसल्याचे सांगितले. त्यानंतर आ. शशिकांत शिंदे यांचे नाव पुढे आले आणि त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. शशिकांत शिंदे यांनी पूर्वीच्या जावली मतदारसंघाचे आणि त्यानंतर कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांनी मंत्री म्हणून ही काम केले आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याचा त्यांना चांगला अनुभव आहे. त्यांचा मुंबईत राहणाऱ्या सातारकरांशी चांगला संपर्क आहे, हा कामगारासाठी लढणारा लढवय्या नेता असून यशवंत विचार जोपासणारे नेतृत्व आहे. आज राज्यात स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे नाव घेतल्याशिवाय एकही सभा सुरू होत नाही. कराड ही यशवंत विचाराची भूमी आहे. त्यामुळे आपल्यावर मोठी जबाबदारी आहे. ती ओळखून या निवडणुकीत इंडिया आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांचे चिन्ह घराघरापर्यंत पोहोचवून त्यांना विजयी करूया.

आनंदराव लादे, मझहर कागदी, सौरभ पाटील, विद्याराणी साळुंखे यांनीही मनोगत व्यक्त केले. नंदकुमार बटाणे यांनी प्रास्ताविक केले तर माजी नगरसेवक शिवाजी पवार यांनी आभार मानले.





### दोन हत्ती चारजणांना भारी....

**सातारा लोकसभा मतदारसंघात शंभुराज, शिवेंद्रराजे, मकरंदआबा, आणि महेश शिंदे असे चार आमदार असल्याचे विरोधी उमेदवाराचे नेते सांगत आहेत मात्र त्यांना हे माहीत नाही की आमचे दोन हत्ती (आमदार बाळासाहेब पाटील व आमदार पृथ्वीराज चव्हाण) चार जणांना भारी आहेत, असा टोलेबाजी नाना खामकर यांनी यावेळी बोलताना केली.**

- **कार्यकर्त्यांनी तत्पर रहावे...**

सातारा लोकसभा मतदारसंघात कराड उत्तर मधून मी स्वतः आणि दक्षिण मधून पृथ्वीराज चव्हाण बाबा हे आम्ही दोन इंडिया आघाडीचे आमदार आहोत. पण इतर मतदारसंघात विरोधी गटाचे उमेदवार असले तरीही तेथे भाजप विरोधात मतदारांमध्ये सुप्त लाट आहे. कराड दक्षिण मतदार संघात ३ लाख ३ हजारांवर मतदार असून एकट्या कराड शहरात ६६१८७ इतके मतदार आहेत, ६१ बुथ आहेत, या प्रत्येक ठिकाणी कार्यकर्त्यांनी तत्पर रहावे, असे आवाहन आमदार बाळासाहेब पाटील यांनी यावेळी केले.

जयवंत पाटील म्हणाले, ही निवडणूक हुकूमशाही विरुद्धची निवडणूक आहे. सर्वत्र लोकशाही धोक्यात आली आहे. कराड शहरात भाजपच्या विरोधात नागरिकांमध्ये मोठा रोष आहे. तो मताव्दारे व्यक्त झाला पाहिजे. यासाठी प्रत्येकाने कामाला लागावे.



# मालदीवमध्ये चीन समर्थक मोहम्मद मुइज्जू यांच्या पक्षाचा दणदणीत विजय, भारताला मोठा धक्का?

मालदीवमध्ये रविवारी झालेल्या संसदीय निवडणुकीत चीन समर्थक मानले जाणारे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू (चेहराशव चींळक्षर्क्षी) यांच्या पक्षाने दणदणीत विजय मिळवला आहे. मालदीवमध्ये चीन समर्थक मोहम्मद मुइज्जू यांच्या पक्षाचा दणदणीत विजय, भारताला मोठा धक्का? मालदीवमध्येरविवारी झालेल्या संसदीय निवडणुकीतचीनसमर्थक मानले जाणारे राष्ट्रपती मोहम्मद मुइज्जू यांच्या पक्षाने दणदणीत विजय मिळवला आहे. मुइज्जू यांच्या पीपल्स नॅशनल काँग्रेस (पीएनसी) पक्षाची दोन तृतियांशी बहुमताच्या दिशेने आगेकूच सुरू आहे. आतापर्यंत समोर आलेल्या निकालांनुसार ९३ सदस्यीय सभागृहातील आतापर्यंत ८६ जागांवरील निकाल जाहीर झाले आहेत. त्यामध्ये मुइज्जू यांच्या पक्षाला तब्बल ६६ जागा मिळाल्या आहेत. तर ६ जागांवर अपक्ष उमेवार निवडून आले आहेत. उर्वरित ७ जागांवरील निकाल जाहीर व्हायचे बाकी आहेत. मात्र आतापर्यंतच्या मतमोजणीमध्ये मुइज्जू यांच्या पक्षाला मिळालेल्या ६६ जागा ह्या बहुमताचा आकडा असलेल्या ४७ जागांपेक्षा १९ ने अधिक आहेत.मालदीवच्यासंसदेमध्ये आतापर्यंत मुइज्जू यांचा विरोधी पक्ष असलेल्या सोलिह यांच्या मालदीवियन डेमोक्रॅटिक पार्टीकडे ४४ सदस्यांसह बहुमत होतं. संसदेत बहुमत नसल्याने मुइज्जू यांना नवे कायदे बनवण्यामध्ये अनेक अडचणी येत होत्या. मात्र आता निवडणुकीतील मोठ्या विजयासह संसदेत बहुमत मिळाल्याने मुइज्जू यांचा मार्ग मोकळा झाला आहे.दरम्यान, मोहम्मद मुइज्जू यांच्या पक्षाला मिळालेला विजय हाभारतासाठीमोठा धक्का मानला जात आहे. तसेच मालदीवमधील जनता हीभारतासहअन्य कुठल्याही देशाशी असलेल्या जवळीकीपेक्षा राष्ट्रपतींच्याचीनसोबतअसलेल्या घनिष्ठ संबंधांची पाठराखण करत आहे, असा या निकालांचा सर्वसाधारण अर्थ निघत आहे. मोहम्मद मुइज्जू हे गतवर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या निवडणुकीमध्ये विजयी होऊन राष्ट्रपतीपदावर विराजमान झाले होते. त्यांनी आपल्या प्रचार मोहिमेदरम्यान, मालदीवचं इंडिया फर्स्ट धोरण संपुष्टात आणण्याचं आश्वासन दिलं होतं. तसेच राष्ट्रपतीपदी विराजमान झाल्यावर त्यांनी त्या दिशेने पावलंही टाकली होती. आता जनतेनेही या निकालांमधून त्यांच्या धोरणावर शिक्कामोर्तब केल्याचं दिसत आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ रोजी गोव्यात



**पणजी** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गोवा भेट येत्या २७ रोजी निश्चित झाली असून भाजपच्या लोकसभा उमेदवारांसाठी या दिवशी वास्को येथे त्यांची जाहीर सभा होण्याची शक्यता आहे.

भाजपच्या सूत्रांनी ही माहिती दिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उत्तर गोव्यात म्हापसा येथे २४ रोजी जाहीर सभा घेणार होते. परंतु लोकसभेचे दुसऱ्या टप्प्यातील मतदान असल्याने त्यांची नियोजित सभा पुढे ढकलण्यात आली आहे.

दक्षिण गोव्यात महिला उमेदवार देऊन भाजपने यावेळी या मतदारसंघात नवा प्रयोग केला आहे. पल्लवी धेंपे या मतदारसंघातून निवडणूक रिंगणात आहेत तर उत्तर गोवा लोकसभा मतदारसंघात केंद्रीय पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक हे सहाव्यांदा निवडणूक लढवत आहेत.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अवघ्या ९५०० मतांनी भाजपला दक्षिण गोवा लोकसभा मतदारसंघ गमवावा लागला होता. या मतदारसंघावर भाजपने जास्त लक्ष केंद्रित केले असून पंतप्रधान मोदी यांच्या दक्षिण गोव्यात जाहीर सभेचे आयोजन हा याचाच एक भाग आहे.

# प्रिन्स हॅरीनं स्वत:च आपला 'पत्ता' कट केला

### ब्रिटनचं राजघराणं पुन्हा एकदा चर्चेत

ब्रिटनचं राजघराणं आपल्या प्रतिष्ठेसाठी जितकं प्रसिद्ध आहे, त्यापेक्षा जास्त ते त्यांच्यातील वादविवादांमुळे प्रसिद्ध आहे. पण या राजघराण्याचं वैशिष्ट्य म्हणजे प्रतिष्ठेच्या कारणानं असो किंवा वादांच्या कारणामुळे, या राजघराण्याचं नाव कायम जगभरात गाजत असतं. कारण कोणतंही असो, या राजघराण्यावर लोकांचं प्रेम आहे आणि त्यांच्याविषयी, त्यांच्या अंतर्गत भानगडींविषयी जाणून घेण्यात केवळ ब्रिटनलाच नव्हे, तर अख्ख्या जगभरातील लोकांना रस आहे. त्यामुळे राजघराण्यात थोडं जरी खुट्ट झालं तरी ती बातमी लोक चवीनं चघळतात.

ब्रिटिश राजघराण्यातील कौटुंबिक वाद, राजघराण्यातील व्यक्ती, त्यांचे वैवाहिक किंवा विवाहबाह्य संबंध, इतकंच काय, ते जिथे कुठे जातील आणि ते जे काही करतील, ती प्रत्येक गोष्ट जगासाठी औत्सुक्याची असते. प्रिन्सेस डायना, त्यांचे विवाहबाह्य संबंध, पॅपाराझ्झींनी त्यांचा केलेला पाठलाग, त्यांचा मृत्यू.. या साऱ्या घटना तर एकेकाळी इतक्या गाजल्या की त्यावेळी संपूर्ण जगात तोच सर्वाधिक चर्चेचा विषय होता. वेळोवेळी या राजघराण्यानं लोकांना अनेक खमंग बातम्या पुरवल्या आहेत.



यावेळी ब्रिटिश राजघराणं पुन्हा चर्चेत आहे, ते प्रिन्स हॅरी आणि त्यांची पत्नी मेगन मर्केल यांच्यामुळे. या दाम्पत्याचे राजघराण्याशी संबंध चांगले नाहीत आणि राजघराण्याशी असलेलं त्यांचं नातं त्यांनी अधिकृतपणे तोडलं असलं तरी प्रिन्स हॅरी आणि मेगन मर्केल यांचा अधिकृत पत्ता आजपर्यंत ब्रिटनमधील बकिंगहॅम पॅलेस हाच होता. मात्र नुकतंच आता अचानक उघड झालं आहे की प्रिन्स हॅरीनं आता अधिकृतपणे ब्रिटनमधील आपलं 'घर' सोडलं आहे. प्रिन्स हॅरी यांनी आपल्या अधिकृत पत्त्यामधून ब्रिटनमधील आपल्या नेहमीच्या घराचा पत्ता बदलला असून, स्थायी पत्ता म्हणून अमेरिकेतील एका ठिकाणाची नोंद केली आहे. माध्यमांच्या 'सतर्कतेमुळे' ही बातमी 'लीक' झाली आहे. पर्यटनाशी संबंधित एका दस्तावेजामध्ये प्रिन्स हॅरी यांनी 'प्रायमरी ड्रेस' म्हणून कॅलिफोर्निया येथील ठिकाणाची नोंद केली आहे.

राजघराण्याशी वादानंतर प्रिन्स हॅरी आणि मेगन मर्केल यांनी राजघराणं सोडलं असलं तरी आतापर्यंत त्यांचा स्थायी पत्ता म्हणून ब्रिटन येथील फॉगमोर कॉटेजचाच पत्ता देण्यात आलेला होता. तो शेवटचा संबंधही त्यांनी आता तोडला आहे. फॉगमोर कॉटेज म्हणजे तेच शाही घर, जे हॅरी आणि मेगन मर्केल यांच्या २०१८मध्ये झालेल्या विवाहानंतर राणी एलिझाबेथ यांनी त्यांना गिफ्ट केलं होतं. पण

## राजघराण्याचे वाभाडे

**प्रिन्स हॅरी आणि मेगन मर्केल यांनी २०२०मध्ये राजघराण्याशी संबंध तोडल्यानंतर शाही राजघराण्याशी त्यांचे संबंध आणखीच बिघडले होते. त्यानंतर गेल्या वर्षी नेटफ्लिक्सवर आलेल्या प्रिन्स हॅरी यांच्यावरील डॉक्युमेंट्रीनं ब्रिटिश राजघराण्याचे अक्षरश: वाभाडे काढले. आता राजघराण्याच्या आणखी एका फोटोवरून नवा वाद रंगला आहे. 'केट गेट' प्रकरण म्हणून सध्या ते चर्चेत आहे. या फोटोत डिजिटली अफरातफर केली गेल्याचा आरोप होत आहे.**

त्यानंतर हॅरी आणि राजघराण्याचे संबंध बिघडले. मार्च २०२१मध्ये हॅरी आणि मेगन मर्केल यांनी एका टीव्ही चॅनलला दिलेल्या मुलाखतीत राजघराण्यावर उघड उघड आरोप केले होते. मेगन यांनी तर राजघराण्यावर वंशवादाचा आरोप करताना म्हटलं होतं, त्यांचा मुलगा आर्ची 'प्रिन्स' बनू नये यासाठी राजघराण्यानं आटापिटा चालवला होता. त्याच्या जन्माच्या आधी त्यांना सर्वांत मोठी भीती ही होती की जन्मानंतर त्याचा वर्ण 'काळा' असू नये!

प्रिन्स हॅरीनं आपलं आत्मचित्र 'स्पेयर'मध्येही राजघराण्याविषयी मोठी टीका केली होती. त्यानंतर प्रिन्स हॅरी आणि त्यांचे पिता किंग चार्ल्स यांच्यात जोरदार खटके उडाले होते. त्यामुळेच प्रिन्स हॅरी यांना घर सोडून जाण्यास सांगण्यात आलं होतं. मेगन यांनी मुलाखतीत सांगितलं होतं, शाही राजघराण्यात लग्न केल्यामुळे आपल्या आयुष्यात मोठा सकारात्मक बदल होईल असं मला वाटलं होतं; पण झालं उलटंच, माझं स्वातंत्र्य इतकं संकुचित झालं की मला घराबाहेर पडणंही मुश्कील झालं. राजघराण्यात मी अक्षरश: एकाकी पडले. मित्रमैत्रिणींबरोबर साधं 'लंच'ला जाण्यासाठीही मला परवानगी नव्हती. एक वेळ तर अशी आली होती की मी आतून पूर्णत: मोडून पडले होते. मी नैराश्यात गेले होते. माझी जगण्याची इच्छाच पूर्णत: मेली होती. आत्महत्येच्या विचारांनी डोक्यात थैमान घातलं होतं. माझी सर्वांत मोठी चूक ही होती की मी राजघराण्यावर विश्वास ठेवला. मी इथे सुरक्षित असेन, असा विश्वास मला देण्यात आला होता; पण तसं कधीच घडलं नाही.प्रिन्स हॅरीनंही मुलाखतीत म्हटलं होतं, माझ्या पत्नीविषयी मला अतिशय गर्व आहे. जे काही तिनं सोसलं, सहन केलं, त्यासाठी छाती हिंमतवान माणसाचीच असली पाहिजे!..

# ममता सरकारला मोठा धक्का, २३ हजार नोकऱ्या रद्द



## शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी न्यायालयाचा निर्णय

**कोलकाता** : लोकसभा निवडणुकीपूर्वापश्चिम बंगालमधीलममता सरकारला मोठा धक्का बसला आहे.पश्चिम बंगालमधीलशालेय सेवा आयोगाच्या (स्कूल सर्व्हिस कमिशन) शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी उच्चन्यायालयाचानिर्णय आला आहे. कोलकाता उच्चन्यायालयाने२३ हजारांहून अधिक नोकऱ्या रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे पश्चिम बंगालमधील ममता सरकारला मोठा धक्का बसला आहे.

२०१६ मध्ये मिळालेल्या नोकऱ्या उच्च न्यायालयाने रद्द केल्या आहेत. एवढेच नाही तर उच्च न्यायालयाने या लोकांना ४ आठवड्यांत पगार परत करण्याचे आदेश दिले आहेत. शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती देवांशू बसाक यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

२०१६ मध्ये पश्चिम बंगालमधील शाळांमधील भरतीमधील विसंगतींची सीबीआय चौकशी करेल, असेही उच्च न्यायालयाने सांगितले.शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी माजी शिक्षणमंत्री पार्थ चॅटर्जी आणि तृणमूल काँग्रेसचे इतर नेते, आमदार आणि शिक्षण विभागातील अनेक अधिकारीही तुरुंगात आहेत.

दरम्यान, आता उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे बंगाल सरकारचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे २४,६४० रिक्त पदांसाठी २३ लाखांहून अधिक उमेदवारांनी २०१६ एसएलएसटी परीक्षा दिली होती.कोलकाता उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभिजित गांगुली (जे आता भाजपाचे नेते आहेत आणि तमलूक लोकसभा मतदार संघातील उमेदवार आहेत) यांनी या प्रकरणाची सुनावणी सीबीआयकडे सोपवली होती आणि पार्थ चॅटर्जी यांनाही सीबीआयसमोर हजर राहण्याचे आदेश दिले होते.

यानंतर पार्थ चॅटर्जी यांना अटडड)क करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत पाच हजार जणांच्या नोकऱ्या गेल्या आहेत, ज्यांना चुकीच्या पद्धतीने नोकऱ्या देण्यात आल्या होत्या.

# युद्ध लढत असलेल्या देशांना अमेरिकेचा पैंसा



**तेहरान** : इराण आणि इस्रायलमध्ये संघर्षाची व्याप्ती वाढत असताना अमेरिकी लोकप्रतिनिधींनी युक्रेन, इस्रायल आणि तैवानला सुरक्षा, शस्त्रे पुरविठ्यासाठी तब्बल ९५ अब्ज डॉलर्स मदत पॅकेज मंजूर केले आहे. शनिवारी पारित झालेल्या बहुप्रतीक्षित विधेयकाला पाठिंबा मिळाला आहे. यामुळे युक्रेनकडून रशियावर आणि इस्रायलकडून इराणवर आणखी हल्ले होण्याची शक्यता वाढली आहे.रशियाने हे पॅकेज घोषित करण्याला युक्रेनचा नाश होणार असून, अधिक मृत्यू होतील, असा इशारा दिला. तिकडे इराणनेही प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेत पुढे काय कारवाई करायची याचा आढावा घेतला. त्यामुळे तणाव आणखी वाढेल. हल्ल्यात हिजबुल्लाहचे तीन सैनिक ठार

इराण समर्थित हिजबुल्लाह गटाने सांगितले की, शनिवारी दक्षिण लेबनॉनमध्ये इस्रायली हल्ल्यात त्यांचे तीन सैनिक मारले गेले. गाझा युद्ध सुरू झाल्यापासून हमासच्या मित्रपक्षाने इस्रायली सैन्यावर दररोज सीमेपलीकडून गोळीबार केला आहे.अमेरिकेने कोणत्या देशाला किती मदत दिली?इस्रायल : २६.३८ अब्ज डॉलर्स

५.२ अब्ज डॉलर्स : क्षेपणास्त्र आणि रॉकेट संरक्षण तसेच विस्तार

३.५ अब्ज डॉलर्स : प्रगत शस्त्रे प्रणाली खरेदीसाठी

१ अब्ज डॉलर्स : शस्त्रास्त्रांचे उत्पादन वाढवण्यासाठी, ४.४ अब्ज डॉलर्स : इतर पुरवठा आणि सेवांसाठी

९.२ अब्ज डॉलर्स : मानवतावादी सेवायुक्रेन : ६०.९४ अब्ज डॉलर्स

२३ अब्ज डॉलर्स : शस्त्रे, साठा आणि सुविधा पुन्हा भरण्यासाठी

१२ अब्ज डॉलर्स : युक्रेन

### युक्रेन, इस्रायल व तैवानला ९५ अब्ज डॉलर्सची मदत

सुरक्षा साहाय्य उपक्रमासाठी

११ अब्ज डॉलर्स : युक्रेनियन सैन्याची क्षमता वाढविण्यासाठी

८ अब्ज डॉलर्स : सरकारला पगार देण्यास मदत करणारतैवान : ८.१२ अब्ज डॉलर्स

स्टिंगर अँटी-एअरक्राफ्ट क्षेपणास्त्रांसारख्या यूएस शस्त्रास्त्रचा पुरवठामदतीचा असा झाला परिणामयुक्रेन : मदतीचे पॅकेज घोषित होताच युक्रेनच्या विशेष फौजांनी शनिवारी रात्रभर ड्रोन्सच्या माध्यमातून रशियाच्या ८ ठिकाणांवर हल्ला केला. या हल्ल्यात रशियाचे ३ ऊर्जा स्टेशन आणि इंधन डेपोंना आग लागली. या हल्ल्यात २ सामान्य नागरिकांचा मृत्यू झाला आहे. रशियानेही हल्ला झाल्याचे मान्य करत युक्रेनच्या ५० ड्रोनला पाडल्याचा दावा केला आहे. इस्रायल : इस्रायलने दक्षिणी गाझा शहर रफाहावर मोठा हल्ला केला. यामध्ये १८ मुलांसह २२ लोकांचा मृत्यू झाला आहे. इस्रायलने रफाहवर जवळपास दररोज हवाई हल्ले सुरू केले आहे. येथे गाझातील तब्बल २३ लाख लोकसंख्येपैकी निम्म्याहून अधिक लोकांनी आश्रय घेतला आहे. अमेरिकेसह इतर अनेक देशांनी संयम राखण्याचे आवाहन असूनही जमिनीवरून आक्रमण वाढविण्याचा निर्धार इस्रायलने कायम ठेवला आहे.

# इराकच्या सैन्य तळावर हवाई हल्ला; एकाचा मृत्यू, ८ जखमी

**बगदाद (इराक)** : इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी इराकमधील एका लष्करी तळावर हवाई हल्ला करण्यात आला. एका स्थानिक वृत्तसंस्थेनुसार, यात एकाचा मृत्यू झाला, तर आठ जण जखमी झाले.

इराण समर्थित पॉप्युलर मोबिलायझेशन फोर्सच्या (पीएमएफ) मुख्यालयावर हवाई हल्ला झाल्याचे वृत्त इस्रायलच्या टाइम्सने दिले आहे. मात्र हा हल्ला कोणी केला याची माहिती मिळालेली नाही. पीएमएफच्या अधिकाऱ्यांनी या हल्ल्याचा आरोप अमेरिकन सैनिकांवर केला आहे. मात्र अमेरिकन लष्कराने त्यांचे आरोप फेटाळून लावले. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे ही माहिती दिली. याशिवाय इस्रायलनेही हल्ल्यातील आपली भूमिका नाकारली आहे.

आयसीस विरोधासाठी



'पीएमएफ'ची निर्मिती

पीएमएफला हशेद अल-शाबी म्हणूनही ओळखले जाते. ही शिया पंथाची सशस्त्र गटांची संघटना आहे, जी २०१४ मध्ये जागतिक दहशतवादी संघटना इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरियाशी लढण्यासाठी स्थापन करण्यात आली होती. अनेक कारवायांमध्ये या संघटनेच्या समर्थकांनी उघडपणे भाग घेतला आहे.

पीएमएफ आता इराकच्या सुरक्षा दलाचा एक भाग आहे. स्थानिक वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, हल्ल्यामध्ये पीएमएफच्या एका गोदामाला लक्ष्य करण्यात आले. यामध्ये काही उपकरणे, शस्त्रे आणि लष्करी वाहनांचे नुकसान झाले आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये पीएमएफने इराक आणि सीरियामध्ये उपस्थित असलेल्या अमेरिकन सैनिकांवर हल्ले केले होते.

हमासविरुद्धच्या युद्धात अमेरिका इस्रायलला पाठिंबा देत असल्याचे संघटनेने म्हटले होते. याच्या निषेधार्थ अमेरिकन सैन्याने हा हल्ला केला, असे पीएमएफचे म्हणणे आहे.

# अवकाळी पावसाचा आंबा उत्पादनाला फटका

**पणजी:** राज्यात शनिवारी पडलेल्या अवकाळी पावसाचा आंब्याच्या उत्पादनाला फटका बसला आहे. नुकतेच पिकायला आलेले आंबे पाऊस तसेच वादळी वाऱ्याने गळून पडले आहेत. तर काही आंबे पावसामुळे कुजले आहेत. बहुतांश शेतकऱ्यांचे पिकायला आलेले आंबे पाऊस तसेच वाऱ्याने झडले यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.या वर्षी अगोदरच आंब्याचे उत्पादन खूप कमी आहे. तसेच उशीरा उत्पादन झाले आहे. अजूनही राज्यात मोठ्या प्रमाणात स्थानिक मानकुरादआंबादाखल झालेला नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणातआंबाबाहेरुन आयात केला जातो. आताच कुठेतरी बागायतीमध्ये आंबा पिकायला सुरुवात होणार होती. लोक आता आंबे काढून पिकायला घालणार होते. पण त्या अगोदरच पाऊस आल्याने झाडावरील आंबे झडले तसेच ते कुजून शेतकऱ्यांचे नुकसान झाले.राज्यात अजून गेल्यावर्षीप्रमाणे आंबा दाखल झाला नसल्याने मानकुराद आंब्याचा दर ८०० ते १ हजार पर्यंत आहे.तर हापूस ६०० रुपये डझनने विकला जात आहे. पण या वर्षी लागवड तसेच आवक कमी असल्याने किमती खाली येणार नाही. असे काही आंबा उत्पादक सांगत आहेत.

# सराव करताना अनर्थ, जपानच्या नौदलाची २ हेलिकॉप्टर कोसळली थेट पॅसिफिक महासागरात; एकाचा मृत्यू, ७ बेपत्ता

**टोकियो** : जपानच्या नौदलाची दोन हेलिकॉप्टर टोकियोच्या दक्षिणेला पॅसिफिक महासागरात कोसळली. रात्रीच्या वेळी सराव करीत असताना ही दुर्घटना घडली. यात एकाचा मृत्यू झाला असून, सात जण बेपत्ता आहेत.

मेरिटाइम सेल्फ डिफेन्स फोर्सची दोन एसएच-६० के हेलिकॉप्टर रात्रीच्या वेळी सराव करीत होती. या हेलिकॉप्टरमध्ये प्रत्येकी चार कर्मचारी होते. टोकियोपासून सुमारे ६०० किलोमीटर दक्षिणेस असलेल्या तोरिशिमा बेटाजवळ शनिवारी रात्री त्यांचा संपर्क तुटला. अपघाताचे कारण समजू शकले नाही. मात्र, दोन्ही हेलिकॉप्टरची टक्कर झाल्याने ती पाण्यात कोसळली असावीत, असा अंदाज संरक्षणमंत्री मिनोरू किहारा यांनी वर्तवला.

जपानने १२ युद्धनौका आणि सात विमानांच्या मदतीने शोध आणि बचावकार्य सुरू केले आहे. जपानच्या तटरक्षक दलाच्या गस्ती नौका आणि विमानेही या मोहिमेत सहभागी झाली आहेत. अपघाताचे कारण स्पष्ट होत नाही आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात नाहीत, तोपर्यंत एसएच-६० विमानांचे प्रशिक्षण स्थगित केले जाईल, असे नौदलाचे प्रमुख अ‍ॅडमिरल रिओ साकाई यांनी स्पष्ट केले.

एक हेलिकॉप्टर नागासाकी येथील हवाई तळाचे होते, तर दुसरे टोकुशिमा प्रांतातील तळावरील होते. शनिवारच्या प्रशिक्षणात केवळ जपानी नौदलाचा सहभाग होता आणि तो बहुराष्ट्रीय सरावाचा भाग नव्हता, असेही त्यांनी सांगितले.